नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक २०५ * * नागपूर * सोमवार, दिनांक २७ ऑक्टोबर २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## इंदूरला जाणाऱ्या एसी बसला आग

■ वृत्तसंस्था, अशोकनगर, दि. २६ :
शनिवारी रात्री अशोकनगर जिल्ह्यात एक भीषण अपघात घडला. इंदूरला जाणाऱ्या एका प्रवासी बसला अचानक आग लागली. बस पूर्णपणे आगीत जळून खाक झाली. ही घटना रात्री ८ वाजताच्या सुमारास इसागड रोडवरील बामनावर गावाजवळ घडली. ही बस कमला ट्रॅव्हल्सची होती आणि प्रवाशांना घेऊन इंदूरला जात होती. आग लागताच बसमध्ये घबराट पसरली. एका पोलिस अधिकाऱ्याने आणि बसमधील चालकाने काचा फोडून प्रवाशांना बाहेर काढले. जवळून जाणारे लोकही मदतीसाठी धावले. यावेळी कोणतीही दुखापत झाली नाही.

# निवडणूका शिवसेना महायुतीत लढणार

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे : शिवसंकल्प प्रशिक्षण शिबिरात पदाधिकारी यांना आभासी पध्दतीने मार्गदर्शन

■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ,, दि. २६ :
आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या 'मिनी विधानसभा' असून, या निवडणुका शिवसेना महायुतीत लढणार आहे, असे स्पष्ट प्रतिपादन शिवसेना मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. यवतमाळ येथे आज रविवारी आयोजित शिवशंकल्प जिल्हा पदाधिकारी प्रशिक्षण शिबिरात ते बोलत होते.



आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी शिवसेनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी शिवसेना नेते, तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या नेतृत्वात यवतमाळ येथे आज रविवारी शिवसंकल्प प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले. हवामान खराब असल्याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे यवतमाळ येथे पोहचू शकले नाही. मात्र त्यांनी 'झूम' मिटिंगद्वारे उपस्थित पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, राज्याचे पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील, मृद व जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड, आमदार नरेंद्र भोंडेकर, माजी आमदार ज्ञानेश्वर धाने पाटील, जगदीश गुप्ता, सहस्त्रराम कोरटे, संजय रायमुलकर, मनोहर चंद्रिकापुरे, विश्वास नांदेकर, शिवसेनेचे सचिव भाऊसाहेब चौधरी, प्रीती बंड आदी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

यावेळी बोलतांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, संजय राठोड यांनी शिवसंकल्प पदाधिकारी प्रशिक्षण शिबिर घेऊन, शिवसैनिकांमध्ये नवा जोश निर्माण केला. राज्यातील या प्रकारचे हे पहिलेच शिव संकल्प शिबिर असून, येत्या निवडणुकीत हे शिबिर शिवसैनिकांना मार्गदर्शक ठरणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत बोलतांना, 'एकत्र संसार करायचा म्हणजे कुरबुरी होतच असतात. त्यामुळे कधी एक पाऊल आपण मागे सरायचे, एक पाऊल त्यांनी मागे सरायचे. पण, आपल्याला महायुती म्हणूनच पुढे जायचे आहे', असे शिंदे म्हणाले.

विरोधकांचा पराभव करायचा आहे, मित्रांचा नव्हे, असा सल्लाही त्यांनी पदाधिकाऱ्यांना दिला. मित्र पक्षासोबत काम करायचे आहे. समजूतदारपणा दाखवला नाही तर, 'तुले ना मले, घाल कुत्र्याले', अशी परिस्थिती होईल, असा इशाराही शिंदे यांनी दिला. या शिबीराच्या निमित्ताने विजयाचा शिवसंकल्प करण्याचे आवाहन त्यांनी केले. येणाऱ्या निवडणुका जिंकणारच आहो, पण गाफील न राहण्याचा सल्ला त्यांनी दिला. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या अनुषंगाने मतदार याद्या बारकाईने पडताळून बोगस मतदारांचा शोध घेण्याचे आवाहन शिवसेना पदाधिकारी, शिवसैनिकांना केले.

या शिबिरात पक्षाच्या तळागाळातील कार्यकर्त्यांना संघटनात्मक कौशल्य, संवादकौशल्य, समाज माध्यमांचा प्रभावी वापर आणि सामाजिक जबाबदारीचे प्रशिक्षण उपस्थित दोन हजारांवर पदाधिकाऱ्यांना दिले. विश्वनाथ केळकर यांनी शिवसेनेतर्फे तयार करण्यात आलेल्या 'लक्ष्यवेध' अपबद्दल माहिती दिली. निवडणुकीत या ॲपचा वापर कसा करावा, बोगस मतदार कसे ओळखावे आदी माहिती दिली. शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी यांनी संघटन बांधणीबद्दल मार्गदर्शन केले. शिवसेना प्रवक्त्या डॉ. ज्योती वाघमारे यांनी राजकारणात महिलांचा सहभाग या विषयावर मार्गदर्शन करून, शिवसेनेची महिला आघाडी ही पक्षाची रणरागिणी असल्याचे सांगितले.

# अग्राग्रलेख
## खरीखरी..
# अदानी की दानी

कोणे एकेकाळी इंग्रजांचे राज्य असताना इंग्रजांचा विरोध असूनही टाटा आणि बिर्ला आणि त्यांच्यासारखेच अनेक उद्योगपती देशाला उद्योग युगात घेऊन जात होते. त्यांना आपल्या उद्योगासाठी सरकारकडून कोणत्याही मेहरबानीची अपेक्षा नव्हती. इमानदारीने आपले उत्पादन जनतेला विकावे, वाजवी नफा मिळवावा हेच त्यांचे ध्येय होते. पण गेल्या पंधरा-वीस वर्षापासून उद्योगांची कक्षा जरा जास्तच रुंदावलेली आहे. यात आता अनेक वाटा आणि वळणेसुद्धा आहेत तशीच काही सरकारी अडवळणेही आहेत. आज भारतामध्ये ज्या दोन गुजराती नावांची उद्योगधंद्यात चलती आहे ते अंबानी आणि अदानी सरकारी यंत्रणेचा अत्यंत हुशारीने वापर करून आघाडीचे उद्योगपती झालेले दिसतात. असे म्हणतात की धीरूभाई अंबानी यांचे इंदिरा गांधी आणि त्यांच्या सरकारमधील तत्कालीन अर्थमंत्री प्रणव मुखर्जी यांच्याशी मधुर संबंध होते. त्या काळात बऱ्याचशा आणि सवलती धीरूभाईंनी मिळवल्या. त्यांनी अनेक परवाने मिळवून हळूहळू आपले साम्राज्य उभे केले पण तरीही अंबानी यांनी आपल्याला पचेल एवढेच कर्ज बँकांकडून घेतले. तसेच त्यांनी आपल्या उद्योगातील शेअर्स विकून बराच पैसा उभा केला आणि शेअर धारकांना चांगला परतावा मिळत असल्याने धीरूभाई अंबानी हे दिवसेंदिवस भरभराटीच्या शिखरावर पोहोचले होते. त्या काळात ध्येयाने चालणारे टाटा साम्राज्य आपल्या कायदेशीर मार्गाने वेगवेगळ्या क्षेत्रात आपला झेंडा बुलंद करीत होते. टाटा समूहाच्या उत्पन्नातील बराच मोठा हिस्सा जनोपयोगी कार्यासाठी आपोआपच दिला जात होता. बिर्ला साम्राज्याचे आदिपुरुष घनश्यामदास बिर्ला यांच्या निधनानंतर बिर्ला साम्राज्य त्यांच्या पुढच्या पिढीकडे आले आणि त्यामध्ये बरेच दावेदार उद्योगपती निर्माण झाले. ही सर्व मंडळी किंवा इतर अनेक उद्योगपती यामध्ये गोदरेज, सिंघानिया, किर्लोस्कर, मोदी, कल्याणी यासारखे अनेक उद्योगपती सरळमार्गी होते किंवा आहेत, आता आपण मूळ मुद्द्यावर येऊ. आपल्या देशात गौतम अदानी नावाच्या एका छोट्याशा उद्योगपतीने फक्त गेल्या अकरा वर्षात जवळपास संपूर्ण भारताला व्यापून टाकलेले आहे, त्याच्या उद्योग वाढीचा वारू अगदी चौफेर वेगाने उधळू लागलेला आहे. कोणतीही तत्त्वनिष्ठा नाही, देश किंवा समाजाप्रती बांधिलकीही नाही तरीही प्रत्येक क्षेत्रात हावरटासारखा प्रवेश करणारा अदानी समूह केवळ आपल्या देशातच नाही तर परदेशातही बदनाम आहे. दोन-तीन वर्षांपूर्वी या अदानीचा काळा इतिहास एका तज्ञ कंपनीने जगासमोर उघड केला होता. अदानी आपले इप्सीत साध्य करण्यासाठी देशात काय किंवा परदेशात काय वाटेल तेवढा पैसा ओतत होता. यामुळेच अमेरिकेत या गौतम अदानीवर गंभीर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. या सगळ्या गोष्टींमुळे गौतम अदानीला ज्या वाकड्यातिकड्या मार्गाने वेगवेगळ्या क्लृप्त्या वापरून जो काही फायदा मिळत होता, तो कमी झालेला आहे. तरीही अदानीने अशी काही जादू केलेली आहे की, अनेक बँकांनी त्याला दिलेले भरमसाठ कर्ज माफ करून टाकलेले आहे. आता तर अदानीच्या वाढलेल्या पसाऱ्याला आणि त्याच्या हावरटपणाला धरबंद नसल्यामुळे त्याला पूर्वी घेतलेल्या कर्जाचे हप्ते चुकविणे आता कठीण जात आहे. कुठून तरी मोठ्या प्रमाणात पैसा उभा केल्याशिवाय आपले साम्राज्य टिकणार नाही हे अदानीलाही समजलेले आहे. त्यामुळे अदानीच्या सेवेसाठी भारतातील सर्वात मोठ्या भारतीय आयुर्विमा महामंडळाचा पैसा आता अदानीला हवा आहे. त्यासाठी ३.९ अब्ज डॉलरच्या निधीची थेट गुंतवणूक करण्याचा प्रस्ताव काही सरकारी अधिकाऱ्यांनी तयार केलेला होता. त्याला मान्यताही मिळाली होती अर्थात हा आमचा शोध नाही. अमेरिकेतील अत्यंत विश्वसनीय वृत्तपत्र असलेल्या वॉशिंग्टन पोस्टने हा खळबळजनक दावा केलेला आहे. विरोधी पक्ष या मुद्द्यावर आक्रमक झालेला आहेच. आयुर्विमा महामंडळाचा पैसा सर्वसामान्य माणसांचा आहे तो अशा एखाद्या बदनाम उद्योगपतीला देणे म्हणजे जनतेच्या पैशाचा दुरुपयोग आहे असे म्हटले तर ते वावगे ठरू नये. गंमत अशी आहे की, अद्यापि आयुर्विमा महामंडळाचा हा पैसा दिला गेलेला नाही आणि वॉशिंग्टन पोस्ट च्या दाव्याचे मात्र खंडन केले गेलेले आहे. जो पैसा देण्याबाबतचा निर्णय झाला होता त्याचा निर्णय अर्थ मंत्रालय, नीती आयोग आणि आयुर्विमा महामंडळातील वरिष्ठांनीच घेतला होता. आता ही रक्कम मिळाली नाही तर अदानीला प्रचंड कर्जाच्या ओज्याची परतफेड करणे महाकठीण होणार आहे. पण आता विरोधी पक्षांनी गदारोळ केल्यामुळे आयुर्विमा महामंडळाला सारवासारव करणे क्रमप्राप्तच आहे. आपले अत्यंत प्रामाणिक पंतप्रधान या प्रकरणाच्या मुळाशी जाऊन भारतातील सर्वसामान्य जनतेचा पैशाचा दुरुपयोग करू देणार नाहीत असे सर्वसामान्य जनतेला वाटणे स्वाभाविक आहे. जर तसा निर्णय झाला नसेल तर आयुर्विमा महामंडळाने वॉशिंग्टन पोस्टवर न्यायालयात खटलाच दाखल केला पाहिजे. याबाबतीत आमची अल्पमती असे सांगते की, अदानी यांच्या इक्विटी वृद्धीसाठी काहीतरी करणे भाग आहे. कारण अदानी आता अर्ध्या मुंबईचे विकासक म्हणून कार्यरत आहेत, त्यासाठी त्यांना प्रचंड भांडवलाची गरज आहे. आता पुढे काय होणार हे आम्ही सांगू शकत नाही. फक्त आपले आयुर्विमा महामंडळ गोत्यात येऊ नये, एवढीच आमची अपेक्षा आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# निवडणूक आयोग मतदार याद्यांचे पुनरीक्षण करणार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २६ :
काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी १८ सप्टेंबर रोजी ३१ मिनिटांचे सादरीकरण केले. त्यात त्यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार लोकशाही नष्ट करणाऱ्या आणि मते चोरणाऱ्यांना संरक्षण देत असल्याचा आरोप केला. कर्नाटकातील आळंद विधानसभा मतदारसंघाचे उदाहरण देत राहुल यांनी दावा केला की काँग्रेस समर्थकांची मते तेथे पद्धतशीरपणे हटवण्यात आली. महाराष्ट्रातही मतचोरी झाली असाही आरोप झाला होता. यानंतर देशभर मतदार चोरीचा मुद्दा गाजला. त्यानंतर आता निवडणूक आयोगाने पुढील आठवड्यात देशभरातील मतदार याद्यांचे विशेष पुनरीक्षण (एसआयआर) सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरमध्ये प्रसार माध्यमांशी बोलताना महत्वपूर्ण विधान केले. त्यांनी मतदार याद्यांच्या पुनरीक्षणाचे स्वागत करत विरोधकांवरही निशाणा साधला आहे.



मतदार याद्यांचे विशेष पुनरीक्षण १०-१५ राज्यांमध्ये सुरू होणार आहे. पुढील वर्षाच्या आत विधानसभा निवडणुका होणाऱ्या राज्यांमध्ये प्रथम मतदार याद्यांचे पुनरीक्षण होणार आहे. यात आसाम, तामिळनाडू, पुदुचेरी, केरळ आणि पश्चिम बंगालमध्ये २०२६ मध्ये विधानसभा निवडणुका होतील. एसआयआरच्या अंमलबजावणीसाठीची चौकट अंतिम करण्यासाठी आयोगाने अलीकडेच राज्य मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांसोबत दोन बैठका घेतल्या.

अनेक सीईओंनी शेवटच्या एसआयआरनंतर प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या मतदार याद्या त्यांच्या संबंधित राज्य वेबसाइटवर अपलोड केल्या आहेत. २००८ ची मतदार यादी दिल्लीच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. उत्तराखंडमध्ये, शेवटचा एसआयआर २००६ मध्ये करण्यात आला होता आणि त्यावेळची मतदार यादी आता राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या संकेतस्थळावर आहे.

### काय म्हणाले मुख्यमंत्री फडणवीस

मतदार चोरीवरून आरोपावरून विरोधक १ नोव्हेंबरला मोर्चा काढणार आहे. यावर मुख्यमंत्र्यांना प्रश्न विचारण्यात आला असता ते म्हणाले की, मतदार याद्यांचे विशेष पुनरीक्षण करावे यासाठी मी स्वतः २०१२ पासून मागणी करत आहे. एसआयआर झाले पाहिले या मताचा मी आहे. निवडणूक आयोगाने आता मतदार यांच्यांचे पुनरीक्षण करण्याचा घेतलेला निर्णय स्वागतार्हय आहे. पराभवामुळे विरोधकांमध्ये नैराश्य पसरले आहे. त्यामुळे असे आंदोलने करतात. विरोधकांची नोटचोरी बंद झाल्याने ते व्होटचारीचा आरोप करत असल्याची टीकाही मुख्यमंत्र्यांनी केली.

## संक्रमित रक्त चढवल्याने
# ५ एचआयव्ही पॉझिटिव्ह

■ वृत्तसंस्था, रांची, दि. २६ :
झारखंडमधील चाईबासा येथील सदर रुग्णालयात आरोग्य विभागाच्या निष्काळजीपणाचे प्रकरण समोर आले आहे. थॅलेसेमियाने ग्रस्त पाच मुलांमध्ये एचआयव्हीची लागण झाल्याचे आढळले आहे. त्यांना संक्रमित रक्त चढवण्यात आले होते.

मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी सिव्हिल सर्जनसह संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित केले आहे. त्यांनी बाधित मुलांच्या कुटुंबियांना प्रत्येकी २ लाख रुपयांची आर्थिक मदत करण्याचे आदेश दिले आहेत.

राज्य सरकार बाधित मुलांना संपूर्ण उपचार देईल. मुख्यमंत्री म्हणाले, "मुलांच्या जीवाशी छेडछाड कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतली जाणार नाही आणि दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल."

तसेच, झारखंड उच्च न्यायालयाने या प्रकरणात राज्याच्या आरोग्य सचिव आणि जिल्हा सिव्हिल सर्जनकडून अहवाल मागितला आहे. याच रक्तपेढीत, थॅलेसेमिया ग्रस्त मुलांना संक्रमित रक्त दिले जात असे.

याच रक्तपेढीत, थॅलेसेमिया ग्रस्त मुलांना संक्रमित रक्त दिले जात असे. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार चौकशी करण्यात आली. खरं तर, ३ सप्टेंबर रोजी, थॅलेसेमियाने ग्रस्त असलेल्या ७ वर्षांच्या मुलाला संक्रमित रक्त चढवण्यात आले. १८ ऑक्टोबर रोजी त्याची चाचणी केली असता, तो एचआयव्ही पॉझिटिव्ह असल्याचे आढळून आले.

# २१ नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण

■ वृत्तसंस्था, कांकेर, दि. २६ :
रविवारी छत्तीसगडमधील कांकेर येथे २१ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले. यामुळे छत्तीसगडमध्ये या वर्षी आत्मसमर्पण करणाऱ्या नक्षलवाद्यांची एकूण संख्या २,०४० झाली आहे. रविवारी आत्मसमर्पण करणाऱ्या नक्षलवाद्यांमध्ये १३ महिला आणि आठ पुरुष कार्यकर्त्यांचा समावेश होता. हे नक्षलवादी केशकल विभागाच्या कुएमारी/किस्कोडो एरिया कमिटीचा भाग होते. विभागीय समिती सचिव मुकेशसह एकूण २१ माओवादी कार्यकर्ते १८ शस्त्रांसह मुख्य प्रवाहात सामील होण्यासाठी पुढे आले आहेत.

२१ आत्मसमर्पण करणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये चार डीव्हीसीएम, नऊ एसीएम आणि आठ पक्ष सदस्यांचा समावेश आहे. कार्यकर्त्यांनी तीन एके-४७ रायफल, चार एसएलआर रायफल, दोन आयएनएएसएएस रायफल, सहा .३०३ रायफल, दोन सिंगल-शॉट रायफल आणि एक बीजीएल शस्त्र देखील आत्मसमर्पण केले. बस्तरचे आयजी पी. सुंदरराज म्हणाले, "कांकेर जिल्ह्यात आज आणखी एक निर्णायक पाऊल उचलण्यात आले जेव्हा २१ माओवादी स्वेच्छेने मुख्य प्रवाहात परतले. डाव्या विचारसरणीच्या अतिरेकी प्रभावाचा सामना करण्यासाठी, समुदायात विश्वास निर्माण करण्यासाठी आणि बस्तरमध्ये शांतता आणि विकासाला चालना देण्यासाठी आमच्या प्रयत्नांमध्ये हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. या २१ माओवाद्यांचे पुनर्वसन आणि पुनर्एकीकरण प्रक्रिया सुरू आहे, जी सुरक्षित, समावेशक आणि प्रगतीशील समाजासाठी आमच्या वचनबद्धतेची पुष्टी करते. आम्ही पुन्हा एकदा या प्रदेशातील उर्वरित माओवादी कार्यकर्त्यांना शांततेचा मार्ग निवडण्याचे आणि समाजात परतण्याचे आवाहन करतो, अन्यथा परिणामांना सामोरे जाण्यास तयार राहा."

या वर्षी दोन हजारांहून अधिक नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे. गृहमंत्री अमित शहा यांनी २०२६ पर्यंत देश नक्षलमुक्त करण्याचे आश्वासन दिले आहे. सुरक्षा दल नक्षलवाद्यांच्या बालेकिल्ल्यात ऑपरेशन करत आहेत. त्याच वेळी, आत्मसमर्पण केलेल्या नक्षलवाद्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध सुविधा पुरवल्या जात आहेत.

# सुजाता मडकेची शास्त्रज्ञपदी निवड

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २६ :
यशाला शॉर्टकट नसतो, पण जिद्द, मेहनत आणि स्वप्नांवर विश्वास असेल तर अवकाशातही भरारी घेता येते या शब्दात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी भारतीय अंतराळ संशोधन संस्थेमध्ये शास्त्रज्ञ म्हणून निवड झालेल्या मोटार परिवहन विभागात वाहन निरीक्षक म्हणून कार्यरत असलेल्या शहापूर तालुक्यातील शिरगाव (जि. ठाणे) येथील सुजाता रामचंद्र मडके हिचे अभिनंदन केले आहे. सध्या ठाणे शहरातील मोटार परिवहन विभागात वाहन निरीक्षक म्हणून कार्यरत असलेल्या सुजाता मडके यांची प्रतिष्ठित भारतीय अंतराळ संशोधन संस्थामध्ये शास्त्रज्ञ म्हणून निवड झाली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाने केवळ ठाणे जिल्हाच नव्हे, तर संपूर्ण परिवहन विभागाचा गौरव वाढवला आहे. साध्या शेतकरी कुटुंबातून आलेल्या सुजाता यांनी आपल्या शिक्षणात सातत्य राखत, आयुष्यभर कष्ट आणि चिकाटीचा आदर्श घालून दिला.



## लखनौ एक्सप्रेस-वेवर धावत्या बसला आग

■ वृत्तसंस्था, लखनौ, दि. २६ :
लखनौमधील आग्रा एक्सप्रेसवे वरून प्रवास करणाऱ्या एका एसी बसचा टायर अचानक फुटला आणि त्यामुळे भीषण आग लागली. काही मिनिटांतच बस आगीच्या भक्ष्यस्थानी पडली.

अपघाताच्या वेळी बसमध्ये सत्तर प्रवासी होते आणि ते सर्वजण थोडक्यात बचावले. आग इतकी भीषण होती की धुराचे लोट दोन किलोमीटर अंतरापर्यंत दिसत होते.

# वाघाच्या हल्ल्यात महिला ठार

■ महासागर प्रतिनिधी
गोंडपीपरी, दि. २६ :

**गणेशपिपरी शेत शिवारातील घटना**

गोंडपीपरी तालुक्यात वाघाची दहशत कायम आहे. मागील काही दिवसापूर्वी चेकपीपरी येथील भाऊजी पाल या शेतकऱ्यांला वाघाने हल्ला करून ठार केल्याची घटना घडली.परत एकदा वाघाच्या हल्ल्याने मानवी जीव घेतला आहे.आज सायंकाळी पाच वाजताच्या सुमारास तालुक्यातील गणेशपिपरी शेतशिवारात वाघाने हल्ला करून एका महिलेला ठार केल्याची घटना घडली आहे.

मृत महिलेचे नाव अल्काताई पांडुरंग पेंदोर वय ४५ वर्ष रा. गणेशपिपरी असे आहे. एकाच आठवड्यात वाघाचा हल्ल्यात दोघे ठार झाल्याने नागरिकात प्रचंड भीती पसरली आहे. सध्या तालुक्यात शेतीचे कामे सुरू आहेत. सदर महिला शेतात कापूस वेचणी करीत होती. याच दरम्यान वाघाने हल्ला करून ठार केले. घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी, पोलिस कर्मचारी आणि स्थानिक ग्रामस्थ घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह शवविच्छेदनासाठी गोंडपीपरी ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

सदर भागात काही दिवसांपासून वाघाचे दर्शन होत असल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे सावट पसरले होते. तरीदेखील वनविभागाने योग्य ती काळजी घेतली नसल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# खेळाडूंच्या जडणघडणीसाठी उत्तम पायाभूत सुविधा देण्यावर भर : मुख्यमंत्री

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :
महाराष्ट्रातून आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू तयार व्हावेत या दृष्टीने शासनाच्या क्रीडा विभागाअंतर्गत एक व्यापक धोरण आपण अंगिकारले आहे. खेळाडूंना आपल्या क्रीडा कौशल्यात अधिक पारंगत होता यावे यासाठी तज्ञ प्रशिक्षक, संघ व्यवस्थापक व इतर पायाभूत सुविधा आपण व्यापक प्रमाणात उपलब्ध करुन देत आहोत. मिशन ऑलम्पिकची तयारी क्रीडा विभागामार्फत सुरु करण्यात आली असून गत काही वर्षाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे राज्यातील खेळाडू आता राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत यशाला गवसणी घालताना दिसत असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.




नागपूर येथे धरमपेठ क्रीडा मंडळाच्या वतीने आयोजित ७५ व्या राज्य बास्केटबॉल स्पर्धेच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. यावेळी महाराष्ट राज्य बॉस्केट बॉल असोसिएशनचे अध्यक्ष तथा विधान परिषद सदस्य संदीप जोशी, आमदार विकास ठाकरे, अखिल भारतीय बास्केटबॉल संघटनेचे सचिव कुलविंदर गिल, राज्य बास्केट बॉल असोसिएशनचे सचिव गोविंद मुथुकुमार व मान्यवर उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी क्रीडा क्षेत्राला चालना मिळावी, खेळाडूंना राष्ट्रीय पातळीवर आपल्या क्रीडा कौशल्याला दाखविण्याची संधी मिळावी याहष्टीने खेलो इंडिया हे व्यापक अभियान हाती घेतले. महाराष्ट्राने क्रीडा क्षेत्रात अलिकडच्या काही वर्षात जे सातत्यपूर्ण प्रयत्न केले त्या प्रयत्नांना आपल्या खेळाडूंनी खेलो इंडियामध्ये सार्थकी लावले. गत तीन वर्षात महाराष्ट्र हा खेलो इंडियातील विविध स्पर्धांमध्ये आघाडीवर राहीला असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

नागपूर येथे आपण अधिकाधिक ठिकाणी खेळाडूंसाठी क्रीडा सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. मानकापूर येथे अंतरराष्ट्रीय दर्जाचे उत्तम असे भव्य क्रीडा संकुल साकारत आहोत. मोठया प्रमाणात स्पर्धांचेही आयोजन करीत आहोत. चांगल्या खेळाडूला ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्या उपलब्ध करुन देण्यावर आमचा भर असल्याचे ते म्हणाले. गत आठ वर्ष बास्केटबॉलसाठी संघटनेतील राजकारणामुळे खेळाडूंना अनेक गोष्टींना मुकावे लागले. खेळातील राजकारणाला बाजूला सारून खेळाडूंसाठी आणि क्रीडा क्षेत्रासाठी आमदार संदीप जोशी यांनी महाराष्ट्र बास्केटबॉल असोसिएशनच्या अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारली आहे. ते खेळाडूंसाठी अधिक तत्परतेने आपली जाबाबदारी पूर्ण करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. क्रीडा संघटनामधील आपसी हेव्यादाव्यांपेक्षा खिलाडूवृत्तीला सर्वोच्च स्थान असल्याचे ते म्हणाले. कोणताही खेळाडू या खिलाडूवृत्तीच्या बळावरच आपल्या जीवनाला आकार देऊ शकतो, असे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमात अखिल भारतीय पातळीवरील यश संपादन केलेल्या अंडर १८ व अंडर १३ स्पर्धेतील अनुक्रमांक तिसरा क्रमांक व रनरअप ठरलेल्या खेळाडूंना रोख बक्षीसांचा धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते देण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाराष्ट राज्य बास्केट बॉल असोसिएशनचे अध्यक्ष तथा विधान परिषद सदस्य संदीप जोशी यांनी केले. प्रथमच या स्पर्धा

# मुरलीधर मोहोळ यांचा राजीनामा घ्या विजय वडेट्टीवारांची मागणी



**मुंबई :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी पुण्यातील जैन बोर्डिंग जमीन विक्री प्रकरणी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. मुरलीधर मोहोळ यांनी केंद्रीय राज्यमंत्रिपदावर राहून पुण्यात जमिनीचा मोठा धिंगाणा घातला आहे. त्यामुळे त्यांना त्या पदावर राहण्याचा अजिबात अधिकार नसून, त्यांचा राजीनामा घेतला पाहिजे, असे ते म्हणालेत. यावेळी त्यांनी एलआयसीचा पैसा उद्योगपती गौतम अदानींच्या कंपनीत गुंतवल्याप्रकरणी सरकारवर चांगलेच तोंडसूख घेतले. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यावर पुण्यातील जैन बोर्डिंगची जमीन कथितपणे विक्री करण्याचा घाट घातल्याचा आरोप आहे. सत्ताधारी शिवसेनेचे माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी या प्रकरणी त्यांना खिंडीत पकडले आहे. या प्रकरणी त्यांच्यावर चौफेर टीकेची झोड उठली असताना आता काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. विजय वडेट्टीवार रविवारी पत्रकारांशी बोलताना म्हणाले, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी जे काही कारनामे केलेत ते आता उघड होत आहेत. ही तर केवळ सुरुवात आहे. त्यांनी तिकडे जमिनीच्या संदर्भात मोठा धिंगाणा घातला आहे. असा धिंगाणा सगळेच घालत आहेत. सध्या सगळीकडेच महाराष्ट्र लुटण्याचे काम सुरू आहे. वरपासून खालपर्यंत जमिनी लाटण्याचे काम सुरू झाले आहे. पण एक लक्षात घेतले पाहिजे की, मुरलीधर मोहोळ यांनी केंद्रीय राज्यमंत्रिपदाच्या पदावर राहून अशा प्रकारच्या 2-3 हजार कोटींच्या जमिनीत प्रत्यक्ष भागिदारी असेल तर त्यांना त्या पदावर राहण्याचा अजिबात अधिकार नाही. हे या प्रकरणी आवर्जुन सांगितले गेले पाहिजे. त्यांचा राजीनामा घेतला गेला पाहिजे.

# रवींद्र धंगेकर लढणारा कार्यकर्ता

■ **महासागर प्रतिनिधी, पिंपरी, दि. २६ :**

शिवसेनेचे (शिंदे) पुणे महानगरप्रमुख, माजी आमदार रवींद्र धंगेकर काम करणारा कार्यकर्ता आहे. अन्यायाविरोधात लढणारा कार्यकर्ता आहे. भाजपच्या विरोधात आपली भूमिका नसल्याचे धंगेकर यांनी स्पष्ट केले आहे. जे प्रकरण सुरू आहे, त्यावर लवकरच पडदा पडेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. महायुतीत दंगा करायचा नाही, असे मी धंगेकर यांना सांगितले आहे, असेही ते म्हणाले.

आळंदीतील भक्त निवास आणि महाद्वार ते पुंडलिक मंदिर घाट सुशोभीकरण कामाचे भूमिपूजन उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या रविवारी हस्ते झाले. त्यावेळी ते पत्रकारांशी बोलत होते. मंत्री भरत गोगावले, शिवसेनेचे (शिंदे) पुणे महानगरप्रमुख, माजी आमदार रवींद्र धंगेकर यावेळी उपस्थित होते.

पुण्याचे भाजपचे खासदार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यावर जैन बोर्डिंगच्या जागेवरून धंगेकर यांच्याकडून विविध आरोप केले जात आहेत. महायुतीत एकत्र असलेल्या मोहोळ आणि धंगेकर दोघांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. याबाबत विचारले असता उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, शिवसेनेचे (शिंदे) पुणे महानगरप्रमुख, माजी आमदार रवींद्र धंगेकर काम करणारा कार्यकर्ता आहे.



अन्यायाविरोधात लढणारा कार्यकर्ता आहे. महायुतीत दंगा करायचा नाही, असे मी त्यांना सांगितले आहे. तो विषय आता संपला आहे. धंगेकर यांना ज्या गोष्टीची माहिती मिळाली, त्यावर ते बोलले आहेत. शेवटी महायुती आहे. विरोधकांच्या हातात कोणतेही कोलीत द्यायचे नाही, असे धंगेकर यांना सांगितले आहे. हा विषय संपेल. आळंदीत आल्यावर मनाला समाधान मिळते. मुख्यमंत्री असताना अनेक वेळा आलो आहे. आताही सातत्याने येत आहे. आज भक्त निवासाचे भूमिपूजन झाले. चांगल्या दजार्चे भक्त, घाट निवास होईल. वारकऱ्यांची मोठी सोय होईल. इंद्रायणी नदी प्रदूषणमुक्त करण्यावर काम सुरू आहे. राज्य शासनाने हा मुद्दा गांभीयार्ने घेतला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली एक सादरीकरण झाले आहे. इंद्रायणी नदी प्रदूषणमुक्त करणे हे आमचे प्रमुख काम आहे. प्रदूषणमुक्त इंद्रायणी नदी करण्यासाठी जे काही करावे लागेल ते केले जाईल, असेही शिंदे म्हणाले.

# डीपीआयएफएफचे सीईओ अभिषेक मिश्रावर बलात्काराचा गुन्हा

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २६ :**

दादासाहेब फाळके इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हलचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिषेक मिश्रा यांच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. त्यांच्याविरुद्ध मालवणी पोलीस ठाण्यात बलात्कार आणि लैंगिक अत्याचाराचा गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला असून, या वर्षातील मिश्रा यांच्यावरील बलात्काराचा हा दुसरा खटला आहे.

मालाड येथील मालवणी पोलीस ठाण्यात अभिषेक मिश्रा यांच्याविरुद्ध २३ ऑक्टोबर २०२५ रोजी भारतीय न्याय संहितेच्या कलम ६९ (बलात्कार) आणि ३५१(२) (लैंगिक अत्याचार) अंतर्गत गैर-जामीनपात्र गुन्हे नोंदवले गेले आहेत. पीडित महिलेने तक्रारीत म्हटले आहे की, २०२१ पासून मिश्रा यांनी तिच्यावर वारंवार बलात्कार आणि शारीरिक अत्याचार केला. मिश्रा हे स्वतःला 'क्लास-१ सरकारी अधिकारी' भासवत असत आणि भारत सरकारचे चिन्ह व लाल बीकन असलेली गाडी वापरत होते, ज्यामुळे तो खरा सरकारी



अधिकारी असल्याचा विश्वास बसला.

याच विश्वासाचा गैरफायदा घेत मिश्रा यांनी लग्नाचे खोटे आश्वासन दिले, खासगी छायाचित्रे सार्वजनिक करण्याची धमकी दिली, तसेच वडिलांमार्फत आणि उच्च राजकीय संपर्काच्या माध्यमातून पीडितेला धमकावल्याचे एफआयआरमध्ये नमूद आहे.

सुरक्षेच्या भीतीने आपण बराच काळ मौन बाळगल्याचे पीडितेने पोलिसांना सांगितले. विशेष म्हणजे, मे २०२५ मध्ये अंबोली पोलीस ठाण्यात एका दुसऱ्या महिलेने मिश्रा यांच्याविरुद्ध बलात्कार आणि खंडणीचा गुन्हा दाखल केला होता.

# भाजपचा मित्रपक्षांना संपवण्याचा डाव

## स्वतःला वाचविण्यासाठी शिंदे दिल्लीत : हर्षवर्धन सपकाळ



**मुंबईः** भाजप ही चेटकीण असून दुसऱ्यांचे पक्ष खाण्याचा रोग या पक्षाला जडला आहे. आधी त्यांनी विरोधी पक्ष खाल्ले आता मित्रपक्षांना खायला निघाला आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत मित्रपक्षांना स्वबळावर लढायला लावून भाजप शिंदेसेना व अजित पवारांच्या पक्षाचा काटा काढणार हे लक्षात आल्यानेच माझा पक्ष व मला वाचवा, अशी मनधरणी करण्यासाठी एकनाथ शिंदे दिल्लीत गेले, असा हल्लाबोल काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. सत्तेतील गँग्ज ऑफ ट्रिपल इंजिन सरकारमध्ये सर्व काही आलबेल आहे असे नाही. भाजपा, शिंदेसेना व अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातच प्रचंड वाद आहेत, तिन्ही पक्षात कुरघोडीचे राजकारण सुरू असल्याने हे सरकार पाच वर्षे कसे चालणार हा कुतूहलाचा प्रश्न आहे. आता शिंदेसेनेलाच गिळंकृत करण्याचा डाव भाजपने आखला असून स्वतःला वाचवण्यासाठी एकनाथ शिंदे दिल्लीत गेले आहेत, पण भाजपचा मित्रपक्षांबद्दलचा आतापर्यंतचा अनुभव पाहता ते शिंदेना कितपत दाद देतील हे पहावे लागेल, असे सपकाळ म्हणाले. शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी केलेल्या आरोपावर बोलताना सरकार त्यांच्याच पक्षाचे आहे, मातृभूमी फाऊंडेशनची उच्चस्तरीय चौकशी करा किंवा एसआयटी बसवा आणि त्यात काही तथ्य असेल तर कठोर शिक्षा करा पण ते कांगावा करत असतील तर सार्वजनिक जीवनातून निवृत व्हावे असे आव्हान सपकाळ यांनी दिले.

# राज्यातील कृषी सेवा केंद्रांचा मंगळवारी बंद

■ **महासागर प्रतिनिधी, अहिल्यानगर, दि. २६ :**

राज्य शासनाच्या कृषी विभागाच्या ऑनलाइन प्रणालीच्या (साथी पोर्टल फेज-२) विरोधात राज्यातील कृषी सेवा केंद्रधारक व्यापाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र फर्टिलायझर्स, पेस्टीसाईड्स, सीड्स डीलर्स असोसिएशनने (एमएएफडीए) मंगळवारी (दि. २८) राज्यातील सर्व कृषी सेवा केंद्र एकदिवसीय बंद पाळणार असल्याचे जाहीर केले आहे. या आंदोलनाला अहिल्यानगर जिल्हा खते, बियाणे, कीटकनाशके डीलर्स असोसिएशनने पाठिंबा देत बंदमध्ये सहभागी होणार असल्याची माहिती संघटनेचे जिल्हा सचिव संग्राम पवार व अध्यक्ष छबूराव हराळ यांनी निवेदनाद्वारे दिली आहे.

जिल्हा संघटनेने या संदर्भात जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी यांनाही निवेदन देऊन ही माहिती दिली आहे. संघटनेच्या निवेदनात म्हटले, की साथी पोर्टल फेज-२ प्रणालीमुळे कृषी सेवा केंद्र चालविणाऱ्या विक्रेत्यांना अत्यंत क्लिष्ट प्रक्रिया, तांत्रिक अडचणी, तसेच व्यवहारात अनावश्यक विलंबाचा सामना करावा लागत आहे. परिणामी शेतकऱ्यांना शेतीसाठी खते, बियाणे, कीटकनाशके आदी वेळेवर मिळण्यात मोठे अडथळे निर्माण होत आहेत. शेतकऱ्यांच्या शेती नियोजनावर त्याचा थेट परिणाम होत आहे. कृषी उत्पादनावरही त्याचे परिणाम दिसू लागले आहेत. प्रणालीतील विलंबामुळे खते-बियाण्यांचा पुरवठा उशिरा होत आहे, हे अन्यायकारक आहे, अशी भूमिका वितरकांच्या संघटनेने घेतली आहे. शासनाने प्रणालीतील त्रुटी दुरुस्त कराव्यात, अशी मागणी केली आहे. आमचा बंद हा शेतकऱ्यांच्या हितासाठी आणि प्रणालीतील कार्यक्षमतेसाठी प्रतीकात्मक आंदोलन आहे. शासनाने त्वरित उपाययोजना करावी अन्यथा तीव्र आंदोलन करू, असा इशारा संग्राम पवार व छबूराव हराळ यांनी दिला आहे.

# औरंगाबाद रेल्वेस्थानकाला मिळाले नवे नाव

## छत्रपती संभाजीनगर रेल्वेस्थानक' नावाला केंद्राची मंजुरी

■ **महासागर प्रतिनिधी, छत्रपती संभाजीनगर, दि. २६ :**

केंद्रीय गृह मंत्रालयाने औरंगाबाद रेल्वे स्थानकाच्या 'छत्रपती संभाजीनगर रेल्वेस्थानक' अशा नामांतराला मंजुरी दिली आहे. त्यामुळे आता या रेल्वेस्थानकाच्या नावापुढील 'औरंगाबाद' हे नाव मिटवून 'छत्रपती संभाजीनगर' हे नाव लिहिले जात आहे. केंद्राने 2022 मध्ये औरंगाबाद शहराचे नाव बदलून छत्रपती संभाजीनगर करण्यास मान्यता दिली होती. आता, रेल्वे स्थानकाचे नाव बदलल्यानंतर ही प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

महायुती सरकारने सत्तेत येताच औरंगाबादचे नामकरण छत्रपती संभाजीनगर असे केले होते. त्यानंतर महसुली नोंदीतही तसा बदल करण्यात आला होता. पण रेल्वेस्थानकाचे नाव अजूनही औरंगाबाद असेच होते.





अखेर केंद्रीय गृह मंत्रालयाने औरंगाबाद रेल्वेस्थानकाचे नावही नव्या बदलानुसार छत्रपती संभाजीनगर रेल्वेस्थानक करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. त्यानुसार हे नाव बदलण्यासाठी युद्धपातळीवर काम केले जात आहे. सध्या रेल्वेस्थानकावरील औरंगाबाद हे नाव पुसून त्या जागी छत्रपती संभाजीनगर असे नाव टाकण्यात येत आहे. दक्षिण मध्ये रेल्वेने या बदलाची पुष्टी केली आहे.

यासंबंधीच्या अधिकृत सूचनेत असे म्हटले आहे की, अधिकृत अधिकाऱ्याने दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागातील "औरंगाबाद" रेल्वे स्थानकाचे नाव बदलून "छत्रपती संभाजीनगर" रेल्वे स्थानक असे करण्यास मान्यता दिली आहे. या स्थानकाचा नवीन स्टेशन कोड "उढरठ" असेल.

रेल्वेनुसार, महाराष्ट्र सरकारच्या शिफारशी व गृह मंत्रालयाच्या मान्यतेनुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. स्टेशनचे छत्रपती संभाजीनगर हे नवे नाव मराठा योद्धा छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्य आणि ऐतिहासिक योगदानाचा सन्मान करण्यासाठी ठेवण्यात आले आहे. रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले की, या बदलानंतर, स्टेशनशी संबंधित सर्व माहिती आणि तिकिटे प्रवाशांना नवीन नावाने दिली जातील. रेल्वेने यासंबंधीची आवश्यक ती सर्व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण केली आहे. आता, रेल्वेस्टेशनवरील उद्घोषणाही छत्रपती संभाजीनगर या नव्या नावानेच होईल.

# जमीन नोंदीसाठी महसूलमंत्र्यांच्या सही-शिक्क्याचा गैरवापर



**मुंबई :** जमिनीच्या मालकी हक्काच्या वादातील महसूल दप्तरी नोंद करण्यासाठी एका अज्ञात व्यक्तीने थेट राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या बनावट सही आणि शिक्क्यांचा वापर केल्याचा धक्कादायक प्रकार डोंबिवलीत उघडकीस आला. मंत्रालयातील महसूल विभागाच्या एका विशेष कार्य अधिकाऱ्याचेही बनावट पत्र वापरून हा आदेश काढण्यात आला होता. तक्रारदाराच्या सतर्कतेमुळे हा गैरप्रकार समोर आला असून या प्रकरणी विष्णुनगर पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करून कसून तपास सुरू केला आहे. महसूलमंत्री कार्यालयात केलेल्या चौकशीत, तो आदेश महसूलमंत्री बावनकुळे आणि त्यांचे विशेष कार्य अधिकारी कुंदनकुमार सोनवणे यांच्या बनावट सही आणि शिक्क्याने काढल्याचे उघडकीस आले. या आदेशाचा क्रमांक महसूलमंत्री कार्यालयातील नोंदीशी जुळत नसल्याचेही स्पष्ट झाले. महसूलमंत्री कार्यालयाच्या निर्देशानुसार, ठाण्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयाने या बनावट कागदपत्रे तयार करणाऱ्या अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्याचे आदेश कल्याणच्या उपविभागीय अधिकाऱ्यांना दिले. त्यानुसार महसूल विभागाचे सहायक लक्ष्मण नांगरे यांनी आधी रामनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली. मात्र, हे प्रकरण पश्चिम डोंबिवलीतील शास्त्रीनगर रुग्णालयजवळील जमिनीशी संबंधित असल्याने पुढील चौकशीसाठी ते विष्णुनगर पोलिसांकडे वर्ग करण्यात आले आहे. गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलिस निरीक्षक गहिनीनाथ गमे आणि त्यांचे सहकारी या प्रकरणाचा कसून तपास करत आहेत. महसूल विभागाच्या सर्वोच्च स्तरावरील व्यक्तींच्या सही-शिक्क्याचा गैरवापर झाल्याने यामागील सूत्रधार कोण आहे, याचा शोध पोलिस घेत आहेत.

# डिजिटल ट्रॅकिंगद्वारे औषधातील विषारी रसायनांवर सरकारचा कडक लगाम!

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :**

देशातील औषधनिर्मिती प्रक्रियेत वापरल्या जाणाऱ्या धोकादायक सॉल्व्हेंट्सच्या पुरवठा साखळीवर आता सरकारने डिजिटल नियंत्रण आणले आहे. ड्रग्ज कंट्रोलर जनरल ऑफ इंडिया (डिसीजीआय) ने ऑनलाईन नॅशनल ड्रग्स लायसन्सिंग सिस्टीम या डिजिटल पोर्टलवर उच्च-जोखमीच्या सॉल्व्हेंट्सच्या पुरवठा आणि गुणवत्तेवर डिजिटल मॉनिटरिंग सिस्टीम लागू करण्याचे निर्देश जारी केले आहेत.

हा आदेश मध्यप्रदेशातील २० पेक्षा अधिक बालकांचा डाएथिलीन ग्लायकॉल (डिइजी) दूषित खोकल्याच्या सिरपमुळे झालेल्या मृत्यूनंतर देण्यात आला आहे. डिइजी हे गोड चव असलेले पण अत्यंत विषारी रसायन असून ते प्रामुख्याने औद्योगिक सॉल्व्हेंट म्हणून वापरले जाते. १९३७ मध्ये अमेरिकेतही एका औषधी द्रव्यामुळे १०० हून अधिक मृत्यू झाले होते, तर २०२२-२४ दरम्यान गॅम्बिया, उज्बेकिस्तान आणि कॅमेरूनमध्ये भारतातून निर्यात झालेल्या खोकल्याच्या सिरपमुळे जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार १४१ बालकांचा मृत्यू झाला होता. आता भारत सरकारने या घटनानंतर औषध सुरक्षेवर अधिक कडक पाऊले उचलली आहेत.

याबाबत डीसीजीआय प्रमुख डॉ. राजीव सिंग रघुवंशी यांनी आपल्या पत्रात नमूद केले की, उच्च जोखमीच्या सॉल्व्हेंट्स,जसे की प्रोपिलीन



ग्लायकॉल यांच्या पुरवठा साखळीवर आणि गुणवत्तेवर नियंत्रण ठेवण्यासाठी ओएनडीएलएस पोर्टलवर स्वतंत्र डिजिटल मॉनिटरिंग सिस्टीम विकसित करण्यात आली आहे.या सिस्टीमद्वारे प्रत्येक उत्पादकाला त्यांच्या उत्पादनाच्या बॅचचा तपशील, प्रमाण आणि विक्रीस गेलेल्या विक्रेत्यांची नोंद ओएनडीएलएसवर अपलोड करावी लागेल. जर एखाद्या उत्पादकाकडे आधीच परवाना असेल, तर त्यालाही जुना परवानव्यवस्थापन अंतर्गत माहिती सादर करावी लागेल.अलीकडे मध्यप्रदेशातील खोकल्याच्या सिरपमधील डिइजीमुळे २० पेक्षा अधिक बालकांचा मृत्यू झाल्याची घटना केंद्रीय औषध नियंत्रण संस्था आणि आरोग्य मंत्रालयासाठी धोक्याची घंटा ठरली. त्यानंतर सर्व राज्यांना औषधांच्या गुणवत्तेची पडताळणी आणि बालरोगांसाठीच्या सिरपच्या तर्कसंगत वापरावर देखरेख ठेवण्याचे निर्देश देण्यात आले.याच पार्श्वभूमीवर केंद्राने शेड्युल एम अंतर्गत औषध कारखान्यांच्या तपासणीसाठी व्यापक मोहीम सुरू केली आहे.

ओएनडीएलएस हे सीडॅक (सेंटर फऑर डेव्हलपमेंट ऑफ अॅडव्हान्स कॉम्पुटिंग) आणि सीडीएससीओ यांच्या संयुक्त प्रयत्नातून विकसित केलेले एक एकात्मिक डिजिटल पोर्टल आहे. हे पोर्टल देशभरातील औषध व सौंदर्यप्रसाधन परवान्यांसाठी सिंगल विंडो प्रणाली म्हणून कार्य करते. या नव्या सुधारणा लागू झाल्यानंतर, देशातील सुमारे ८०० सॉल्व्हेंट उत्पादक व ५००० औषध उत्पादक कंपन्यांना यावर नोंदणी करावी लागणार आहे. भारताची औषध निर्यात जवळपास २.२ लाख कोटी रुपयांची असून जगभरातील २०० देशांमध्ये औषध पुरवठा केला जातो. या पार्श्वभूमीवर औषधाची गुणवत्ता हा कळीचा मुद्दा असून यात काही कमरता आढळल्यास निर्यातीवर विपरित परिणाम होऊ शकतो.जागतिक आरोग्य संघटनेच्या २०२४ च्या अहवालानुसार भारतात तयार झालेल्या औषधांपैकी ५ टक्के उत्पादने गुणवत्ता चाचणीत अपयशी ठरतात.

अनेक राज्यात औषध कंपन्यांमध्ये प्रमाणीकरणाच्या कामात त्रुटी आढळून आल्या आहेत तर गुणवत्तापूर्ण औषधाअभावी २०२४ मध्ये देशात ३५० पेक्षा जास्त गंभीर विषबाधा प्रकरणे नोंदविण्यात आली आहेत. या पार्श्वभूमूवर डीसीजीआयने सर्व उत्पादकांना सूचित केले आहे की कोणतेही सॉल्व्हेंट किंवा सिरप या डिजिटल नियमांचे पालन न करता बाजारात आणले जाऊ नयेत.

# महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणात दुसरी अटक

■ **महासागर प्रतिनिधी, सातारा, दि. २६ :**



फलटण उपजिल्हा रुग्णालयातील महिला वैद्यकीय अधिकाऱ्याच्या आत्महत्येप्रकरणी फरार झालेला पोलिस उपनिरीक्षक गोपाळ बदने शनिवारी रात्री उशिरा शरण आला. तत्पूर्वी दुसरा संशयित प्रशांत बनकरला शुक्रवारी रात्री अटक करण्यात आली. सध्या या दोघांचीही पोलिसांकडून कसून चौकशी केली जात आहे. दुसरीकडे, या आत्महत्या प्रकरणामुळे संपूर्ण महाराष्ट्रात मोठा रोष व्यक्त केला जात आहे.

मृत डॉक्टर फलटणला ज्यांच्या घरात भाडेकरू म्हणून राहत होती, त्याचा प्रशांत बनकर हा मुलगा आहे. न्यायालयाने त्याला तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. डॉक्टर महिलेने आत्महत्येपूर्वीच्या सुसाइड नोटमध्ये पोलिस उपनिरीक्षक बदनेने माज्यावर 4 वेळा अत्याचार केला, असे म्हटले होते. तो फरार झाला होता. त्याचा शोध सुरू असताना तोच शरण आला. दुसरीकडे या प्रकरणात भाजपचे माजी खासदार रणजितसिंह निंबाळकर यांच्या चौकशीची मागणी होत आहे. दरम्यान, वडवणी (जि. बीड) तालुक्यातील मूळ गावी त्या महिला डॉक्टरवर अंत्यसंस्कार झाले.

मृत डॉक्टरच्या बहिणीने सांगितले की, मागील महिन्यात माझे तिच्याशी बोलणे झाले. ती म्हणाली, पोस्टमॉर्टेमसाठी माज्यावर दबाव येत आहे. अनफिट असेल तर फिट म्हणून दाखवण्यासाठी दबाव येत होता. त्याला नकार दिल्यामुळे तिला त्रास वाढत गेला. आम्ही पाच पानांचे पत्र दिले. त्याची चौकशी झाली. मात्र त्यातून काहीही निष्पन्न झाले नाही. 80 ते 90 पोस्टममॉर्टेम करणारी मुलगी स्ट्रॉंग नसेल का? ती आत्महत्या करूच शकत नाही, असेही तिच्या बहिणीचे म्हणणे आहे.

फलटणच्या उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत डॉक्टर महिलेने 23 ऑक्टोबर रोजी रात्री फलटण येथील एका लॉजवर गळफास लावून घेऊन आत्महत्या केली होती. या घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली आहे. या गंभीर घटनेच्या तपासासाठी अपर पोलिस अधीक्षक वैशाली कडूकर फलटणमध्ये ठाण मांडून आहेत, तर जिल्हा पोलिस अधीक्षक तुषार दोशी यांनीही फलटणला भेट देऊन तपासाचा आढावा घेतला आहे.

# शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्नशील राहणार : शंभूराज

■ **महासागर प्रतिनिधी, कराड, दि. २६ :**

शिक्षकांना जुनी पेन्शन (निवृत्ती वेतन) योजना व टप्पा वाढ अनुदान देण्यासह मुख्याध्यापक व एकूणच शिक्षण क्षेत्रासमोरील प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याची ग्वाही राज्याचे पर्यटनमंत्री तथा साताराचे पालकमंत्री शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्नशील राहणार- शंभूराज, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ महामंडळाच्या अधिवेशनास प्रारंभशंभूराज देसाई यांनी दिली.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ महामंडळाच्या कराड येथे आयोजित दोन दिवसीय ६४ व्या अधिवेशनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून मुकेश पाटील (नंदुरबार) हे तर, स्वागताध्यक्ष म्हणून राज्याचे माजी सहकारमंत्री बाळासाहेब पाटील हे उपस्थित होते. आमदार महेश शिंदे, आमदार जयंत आसगावकर, आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे आदींची प्रमुख उपस्थिती होती.



अधिवेशनास राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दूरभाष्य प्रणालीद्वारे अधिवेशनाला संबोधित करताना, शिक्षक, मुख्याध्यापकांप्रती सद्भावना व्यक्त केली. त्यांच्या न्याय भूमिकेस समर्थन असल्याचे उभय नेत्यांनी सांगितले.

शंभूराज देसाई म्हणाले की, लोकांना दानधर्म करून जेवढं पुण्य मिळत नाही, त्यापेक्षा जास्त पुण्य तुम्ही शिक्षक ज्ञानार्जनाचे काम करून मिळवता. तरी, तुमचे सर्व प्रश्न सोडवण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत. कितीही संकटे आली, अडचणी आल्या तरी प्रत्येक समाज घटकाला न्याय देण्याचे काम महायुतीचे सरकार करणार असल्याचा विश्वास मंत्री शंभूराज देसाई यांनी दिला.

बाळासाहेब पाटील म्हणाले, महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी कृषी, औद्योगिक क्रांतीसह शिक्षणात अमुलाग्र बदल झाला पाहिजे हा विचार मांडला आणि रुजवलाही. या अधिवेशनातून शिक्षण क्षेत्राला चांगली दिशा मिळेल.आमदार महेश शिंदे, म्हणाले, राज्याला दिशा देणारे हे अधिवेशन आहे. पूर्वीच्या शिक्षण पद्धतीप्रमाणे ६४ कला विद्या आजच्या विद्यार्थ्यार्ला आल्या पाहिजेत, त्यांच्यावर योग्य संस्कार रूजवण्याचे काम सर्वांनी केले पाहिजे, अशी अपेक्षा शिंदे यांनी व्यक्त केली. आमदार जयंत आसगावकर, सुभाष माने, विजय पाटील, तानाजी माने आदींनी मनोगत व्यक्त केले. डॉ. चंद्रकांत पाटील, कौस्तुभ गावडे, मंगेश चिवटे, सचिन नलवडे, बिपीन मोरे यांच्यासह राज्यभरातून शिक्षक व मुख्याध्यापकांची अधिवेशनाला मोठी उपस्थिती होती.

# डिजिटल अरेस्ट मध्ये तरुणीने गमावले ८४ लाख रुपये

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :**

आभासी कैद अर्थात डिजिटल अरेस्ट या सायबर फसणुकीचे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहे. भारतातील उच्चपदस्थ लोकं या फसवणुकीला बळी पडत असतात. मात्र प्रथमच अमेरिकेत राहणारी ३३ वर्षीय तरुणी डिजिटल अरेस्टच्या जाळ्यात फसली आहे. भारतातील सायबर भामट्यांनी तिला मनी लॉड्रींगच्या गुन्ह्यात अटक करण्याची धमकी देऊन ९४ हजार अमेरिक डॉलर म्हणजे भारतीय चलनातील सुमारे ८४ लाख रुपये लंपास केले.

३३ वर्षीय तक्रारदार तरूणी ही बोरीवलीत राहते. ती सॉफ्टवेअर डेव्हलपर म्हणून काम करते. मागील ७ वर्षांपासून ती अमेरिकेच्या न्यू जर्सी शहरात नोकरी करते. तिच्या मनी लॉड्रींगच्या गुन्ह्यात अटक करण्याची धमकी देत आभासी कैदेत ठेवण्यात आले होते.

मागील आठवड्यात या तरुणीला एका दूरध्वनी आला होता. तुमच्या क्रेडीट काडार्चा वापर करून बंदूक विकत घेण्यात आली आहे, असे सांगण्यात आले. मात्र हा फसवणूकीचा प्रकार असल्याचे वाटून तिने तो मोबाईल क्रमांक ब्लॉक केला होता. त्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी भारतातील मोबाईल क्रमांकावरून दूरध्वनी आला. दिल्ली सायबर क्राईम मधून बोलतोय असे फोन करणाऱ्या व्यक्तीने सांगितले. नरेश गोयल यांनी केलेल्या २.५८ मिलियनच्या घोटाळ्यात नाव असल्याचे तिला सांगण्यात सांगितले. मनी लॉड्रींगचा गुन्हा दाखल करून अटक केली जाईल अशी धमकी दिली. त्यानंतर सायबर भामट्याने व्हिडियो कॉल करून नकली पोलीस ठाण्याचा देखावा तयार केला होता. त्यामुळे खरंच दिल्ली गुन्हे शाखेचे पोलीस असतील असे तिला वाटले होते. आरोपींनी मग या तरुणीला जाळ्यात ओढायला सुरवात केली. तिला व्हिडिओ कॉल करून डिजिटल अरेस्ट केल्याचे सांगितले.

# सेवानिवृत्त शिक्षकांना मिळणार निवड श्रेणी प्रशिक्षणाचा लाभ

**आमदार सुधाकर अडबाले यांच्या प्रयत्नांना यश**



■ महासागर प्रतिनिधी
**वाडी, दि. २६ :**

शिक्षकांना सेवाकाळात बारा वर्षांनंतर वरिष्ठ श्रेणी आणि चोवीस वर्षांनंतर निवड श्रेणी अशी पदोन्नती दिली जाते. मात्र, अनेक शिक्षकांनी निवडश्रेणी प्रशिक्षणासाठी नोंदणी (रजिस्ट्रेशन) केले असतानाही सेवानिवृत्तीपूर्वी प्रशिक्षणाची संधी न मिळाल्याने ते या लाभापासून वंचित राहिले होते.या पार्श्वभूमीवर विदर्भ प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष मुरलीधर काळमेघ यांच्या नेतृत्वाखाली शिक्षक आमदार सुधाकर अडबाले यांच्याशी संपर्क साधण्यात आला. या पाठपुराव्यानंतर जिल्हा प्रशिक्षण संस्था यांनी असे मान्य केले की, ज्या शिक्षकांचे कार्यरत काळात रजिस्ट्रेशन झाले आहे, त्यांना निवडश्रेणी प्रशिक्षण देण्यात येईल. त्यानुसार, २५ ऑक्टोबर २०२५ पासून निवडश्रेणी प्रशिक्षणास डायटकडून परवानगी देण्यात आली आहे.आमदार सुधाकर अडबाले यांच्या प्रयत्नामुळे संबंधित सर्व शिक्षकांना प्रशिक्षणाबाबत ई-मेलद्वारे आदेश पाठविण्यात आले आहेत. ज्यांना ई-मेल प्राप्त झालेल नाही, त्यांनी त्वरित डायटच्या प्राचार्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

तसेच, सेवानिवृत्तीनंतर प्रशिक्षण पूर्ण केलेल्या आणि ज्यांची नोंद संबंधित पंचायत समिती कार्यालयात घेतली जात नसल्यास, संबंधितांनी संघटनेकडे तक्रार नोंदवावी, असे स्पष्ट करण्यात आले. सध्या काटोल येथील रविंद्र फिस्के यांची अशा प्रकारची तक्रार संघटनेकडे आलेली आहे. अशा सर्व शिक्षकांनी कार्यालयाकडून विलंब होत असल्यास संघटनेचा संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले.

या प्रसंगी सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक महासभेचे सरचिटणीस दीपक सावळकर, विदर्भ प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हा कार्याध्यक्ष मुरलीधर कामडे, सरचिटणीस नरेंद्र देवगडे, रमेश पाटील यांसह अनेक सेवानिवृत्त शिक्षक उपस्थित होते.

## इ.४ थी व ७ वी करीता शिष्यवृत्ती परिक्षा पुढील वर्षापासून व्हावी

# पालक, शिक्षक व शिक्षक संघटनांची मागणी

■ महासागर प्रतिनिधी
**वाडी, दि. २६ :**

शासनाने नुकत्याच निर्गमित केलेल्या शासन निर्णयान्वये इयत्ता ४ थी व ७ वी वर्गासाठी शिष्यवृत्ती परीक्षेचा घेतलेला निर्णय स्वागतार्ह असला तरी सदर निर्णयची अंमलबजावणी चालू शैक्षणिक वर्षात न करता पुढील शैक्षणिक वर्षापासून होणे न्यायसंगात ठरेल.अशी भुमिका राज्यातील शिक्षक, पालक व शिक्षक संघटनां कडून मांडण्यात येत आहे. तशा प्रकारची मागणी सुद्धा शालेय शिक्षण मंत्री, शालेय शिक्षण राज्यमंत्री व शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिवांकडे निवेदना व्दारे करण्यात आली आहे.सदर परिक्षा ही राज्यातील महत्वाची परीक्षा असून या परिक्षेद्वारे पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना शासनाकडून पुढील तीन वर्ष शिष्यवृती दिल्या जाते.त्यामुळे शैक्षणिक सत्राच्या सुरवाती पासूनच विद्यार्थी, शिक्षक व पालक फार गांभीर्याने या परिक्षेची तयारी करीत असतात.

काही विद्यार्थी व शिक्षक तर या परीक्षेची तयारी मागील शैक्षणिक वर्षाच्या मध्यापासून म्हणजे सुमारे दीड वर्षे तयारी करीत असतात. परंतू या शासन निर्णयानुसार इयत्ता ४ व ७ वी या वर्गासाठी शिष्यवृत्ती परीक्षा फक्त ६ महिने अगोदर अधिकृतपणे जाहीर करण्यात आली असल्याने विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी पुरेसा वेळ मिळणार नाही. परीक्षेच्या तयारीसाठी ६ महिन्याचा कालावधी अत्यल्प असल्याने विद्यार्थी, शिक्षक व पालक यांच्यामध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे या शासन निर्णयाची अंमलबजावणी पुढील शैक्षणिक वर्षात (सन २०२६-२७) करणे न्यायसंगत ठरेल अशी अपेक्षा पालक व शिक्षकांकडून व्यक्त होत आहे.

**प्रतिक्रिया**

मागील काही वर्षापासून ही परिक्षा इ.५ वी व इ.८ वी च्या विद्यार्थ्यांकरीता घेण्यात येत होती त्यामुळे इ. ४ थी व ७ वी च्या विद्यार्थ्यांना या परिक्षेबाबतची कोणतीही पुर्वकल्पना नसल्याने त्यांची याबाबत कुठलीही पुर्वतयारीसुद्धा नाही. त्यामुळे या परिक्षेच्या पुर्वतयारी करीता विद्यार्थ्यांना पुरेसा वेळ मिळणार नाही. विद्यार्थ्यांचे वय व परिक्षेची काठीण्यता या बाबी लक्षात घेता या निर्णयाची अंमलबजावणी पुढील शैक्षणिक सत्रापासून करणे अधिक संयुक्तीक ठरेल.

**लीलाधर ठाकरे, जिल्हाध्यक्ष**
**महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती नागपूर**



## बछड्याच्या विरहात वाघीण करतेय वाहनांवर हल्ला

**नागपूर :** ताडोबा-अंधारीव्याघ्रप्रकल्पाच्या केसलाघाट परिसरातून जात असाल तर सावधान! गेल्या चार-पाच दिवसांपासून या परिसरातील 'के मार्क' नावाची वाघीण कोणतेही वाहन दिसले तरी त्या वाहनांवर हल्ल्याचा प्रयत्न करत आहे. याच हल्ल्यात एकजण जखमी झाल्याची देखील माहिती आहे. दरम्यान, बछड्याच्या मृत्युमुळे ही वाघीण आक्रमक झाल्याची चर्चा देखील वन्यजीव अभ्यासकांमध्ये आहे.ताडोबा-अंधारीव्याघ्रप्रकल्पातील केसलाघाट परिसरातील या वाघिणीला चार बछडे असल्याचे वन्यजीव अभ्यासकांनी पाहिले आहे. यातील एका बछड्याचा याच केसलाघाट मार्गावर वाहनाच्या अपघातात एका बछड्याच्या वाहनाच्या धडकेत मृत्यू झाला. वनखाते यावर काहीही सांगत नसले तरीही रात्री अपघात झाल्यानंतर ताबडतोब या बछड्याला तेथून उचलण्यात आले आणि दुसऱ्यादिवशी सकाळी त्याचे शवविच्छेदन करुन त्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यामुळेच ही वाघीण आक्रमक झाल्याचे अनेकांचे म्हणणे आहे. आता एक दिवसापूर्वी या वाघिणीने एका दुचाकीस्वारावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्याचवेळी एका चारचाकी वाहनामुळे या दुचाकीस्वाराचा जीव वाचला. तर एक जण जखमी झाल्याची देखील माहिती आहे. गेल्या दोन दिवसांपासून या वाघिणीचा एक व्हिडिओ समाजमाध्यमावर सामाईक झाला आहे.

# मोवाड नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारासाठी पक्षाच्या वरिष्ठाकडे रस्सीखेच

- अध्यक्ष महिला ओपन करिता राखीव तर १० महिला उतरणार रिंगणात
- विविध पक्षाचे प्रभागामध्ये कॉर्नर मीटिंग सुरू



■ महासागर प्रतिनिधी
**नरखेड , दि. २६ :**

येत्या काही दिवसांवर मोवाड नगर परिषदेच्या निवडणुका येऊन ठेपल्या आहेत लवकरच निवडणुकीचा प्रोग्राम जाहीर होऊन आचारसंहिता लागण्याची दाट शक्यता आहे.

नगर परिषदेचे अध्यक्ष पद यावेळेस महिला ओपन करिता राखीव झाल्याने अनेकांच्या स्वप्नाचा चुराडा झाला असला तरी मला उमेदवारी मिळावी याकरिता भारतीय जनता पार्टीचे चरणसिंग ठाकूर, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख, राष्ट्रीय काँग्रेस,पार्टीचे वरिष्ठ नेते, शिवसेना उद्धव ठाकरे गट, बहुजन समाज पार्टी, एकनाथ शिंदे गट, अजित पवार गट, आझाद समाज पार्टी, भीम आर्मी, अशा अनेक पक्षाच्या वरिष्ठाकडे अनेकांची लॉबिंग सुरू झाली आहे एवढेच नव्हे तर अनेक इच्छुकांनी मोवाड शहराच्या विविध चौकामध्ये नागरिकांना दीपावलीच्या शुभेच्छा देऊन आम्ही इच्छुक असल्याचा दावा सुद्धा केला आहे. सध्या निवडणुकीच्या रिंगणात अनेक दिग्गज उमेदवार यांनी सत्तेचा आमदार सोडून इतरही राष्ट्रीय पक्षाकडे टिकीट मिळाली पाहिजे असा दावा करत राष्ट्रीय काँग्रेस पार्टी, राष्ट्रवादी शरद पवार गट, शिवसेना उद्धव ठाकरे गट, अजित पवार गट, एकनाथ शिंदे गट इतरही पक्षात तितक्याच ताकतीने निवडणूक लढणार असल्याचे चित्र आहे. पक्ष बदलून आलेले आणि स्वतःचा सार्थ साधणाऱ्या दिग्गजाना यावेळेस नागरिक धडा शिकवणार असल्याचे ही नागरिक बोलून दाखवत आहे.

यावेळेस प्रभाग पद्धती असल्याने १० प्रभाग २० वार्ड तर एक महिला ओपन अध्यक्ष एक नामनिर्देशित नगरसेवक असे एकूण २२ सदस्याची मिनी मंत्रालय नगर परिषद मध्ये नव्याने स्थापना होणार आहे. प्रभाग पद्धती असल्याने चुरशीची लढत रंगतदार होणार असून जुण्याणा डावलून नवीन चेहऱ्यांना संधी मिळण्याची चर्चा मोवाड शहरात ठिकठिकाणी होत आहे.

त्यामुळे नगराध्यक्ष पदाची उमेदवारी आपल्याला मिळावी म्हणून तब्बल १० पेक्षा अधिक महिला निवडणूक रिंगणात उतरणार आहे. गेल्या दहा वर्षापासून मोवाड नगरपरिषद निवडणुका झाल्या नाही मी नगराध्यक्ष पदाची निवडणूक लढणार अशा प्रकारचे स्वप्न अनेकांनी रंगविले होते.

परंतु ती माळ पुरुषांच्या गळ्यात पडणार नसून महिलांच्या हाती सत्ता लाभणार असल्याने मोवाड नगरपरिषद मध्ये लवकरच महिला राज येणार असून कोण किंग ठरणार याकडे मात्र सर्व मोवाडवासी नागरिकाचे लक्ष लागले आहे.

**पंचवटी वृद्धाश्रम**

## वृद्ध आणि गरजूंसोबत दिवाळी उत्सव



■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर, दि. २६ :**

उमरेड रोडवरील पंचवटी वृद्धाश्रम आणि वर्धा रोड, जामठा येथील अशोकवन सेवाश्रमात यावर्षी दिवाळीचा सण कॉमहेड यूकेच्या पुढाकाराने आत्मीयतेने साजरा केला गेला. वृद्धांना पारंपरिक फराळ वाटप करण्यात आले आणि त्यांच्याशी संवाद साधून आनंदाचे क्षण अनुभवले गेले.

कार्यक्रमात कॉमहेड यूकेचे कार्यकारी संचालक डॉ. उदय बोधनकर, मानद सचिव डॉ. प्राजक्ता कडूस्कर, कोषाध्यक्ष डॉ. कमलाकर देवघरे, महाराष्ट्र आयएमएच्या अध्यक्षा डॉ. मंजुषा गिरी, तसेच वृद्धाश्रम आणि सेवाश्रमाच्या प्रमुख उपस्थित होत्या. या उपक्रमातून समाजातील उपेक्षित आणि गरजू घटकांपर्यंत दिवाळीचा आनंद पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात आला. कॉमहेड यूके, युनायटेड किंगडमस्थित आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्था, आरोग्य, पुनर्वसन आणि समाजसेवा क्षेत्रात कार्यरत असून जगातील ५४ कॉमनवेल्थ देशांमध्ये उपेक्षित घटकांच्या कल्याणासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे.

## व्यंकटेश गृहनिर्माण संस्थेचा वार्षिक स्नेहमिलन कार्यक्रम



**नागपूर:** श्री. व्यंकटेश गृहनिर्माण सहकारी संस्था मर्यादित, व्यंकटेश नगर, खामला रोड यांनी वार्षिक स्नेहमिलन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. नरंजन बोबडे यांनी गंध मराठी मातीचा या मराठी गीतांच्या कार्यक्रमाचे सादरीकरण केले. कार्यक्रमात पोवाडा, लावणी, गोंधळ, भक्तिसंगीत, भावगीत, जोगवा आणि सुगमसंगीताचे रंगीत सादरीकरण करण्यात आले. विशेष आकर्षण म्हणजे बालगीत जय महाराष्ट्र माझा , जे बाल कलाकारांनी उस्फुर्तपणे सादर केले. कार्यक्रमाच्या शेवटी विठ्ठलाची पालखी निघून माउली माउली या गाण्याने सर्व श्रोते तल्लीन झाले. सचिन डोंगरे आणि त्यांचा चमू यांचे मोलाचे सहकार्य लाभले. निवेदन धनश्री शेवलकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन अनघा फडके, सचिव, व्यंकटेश मंदिर समिती यांनी केले. व्यंकटेश नगर व आजूबाजूच्या परिसरातील लोकांनी कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला.

## दीपस्तंभची गोरगरीब मुलांसोबत दिवाळी



■ महासागर प्रतिनिधी
**हिंगणा , दि. २६ :**

दीपस्तंभ सामाजिक संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी एकेरी पालक असलेल्या कुटुंबात जाऊन दिवाळी साजरी केली. गोरगरीब मुलांना यावेळी लाडू, चिवडा, मिठाई, शैक्षणिक साहित्य, मुलांना नवीन कपडे, त्यांच्या आईला साडीचोळी देण्यात आली. वरीष्ठ पोलीस अधिकारी निलांबरी जगदाळे, आयुर्विमा कंपनी चे सेवानिवृत्त अधिकारी प्रकाश देशकर, महिंद्रा चे योगेश धुमाळ, मिश्रीकोटकर ,मनाली ठाकूर यांच्या हस्ते हिंगणा तालुक्यातील अंबाझरी, अडेगाव ,भंडारा जिल्ह्यातील कारधा,पारशिवनी तालुक्यातील कारंभाड भागातील अनेक गरजूंना ही मदत देऊन त्यांची दिवाळी गोड करण्यात आली . या उपक्रमात संस्थेचे नंदकिशोर मानकर, विनोद मेहरे, किशोर फिरके तरूण धारवैया, असर फाऊंडेशन चे विक्रम फडके, वैभव कोलते, स्नेहा तिडके, दामिनी सेलोकर,वैदही हाडगे,तननू माहुरकर, वर्षा कोकाटे, रत्ना बैरागी, यवनलाल चौधरी, संगिता पानसे सहभागी झाले होते.

## 'हॅप्पी स्ट्रीट' या कार्यक्रमात नागरिकांसाठी विविध खेळ



**मौदा , दि. २६ :** आज मौदा येथे आयोजित 'हॅप्पी स्ट्रीट' या कार्यक्रमात नागरिकांसाठी विविध खेळ आणि उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे नागरिकांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, उत्तम आरोग्य आणि मानसिक संतुलन राखण्याबाबत जागरूकता निर्माण करणे हा होता. या उत्कृष्ट आयोजनाबद्दल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव राजा भाऊ तिडके यांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि आभार. या प्रसंगी प्रामुख्याने उपस्थित मा खासदार बर्वे साहेब, आमदार वंजारी साहेब,सुरेशभाऊ भोयर साहेब , रामटेक क्षेत्राचे खासदार मा .श्री .श्याम कुमार बर्वे , देवेंद्रजी गोडबोले , राजेंद्रजी लांडे , राजेश निनावे , किशोर साण्डेल , विक्कि साठवणे , शुभम तिघरे , जीतू साठवणे तसेच सर्व मौदा कामठी विधानसभेचे नेते मंडळी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शाहू लेआऊट हनुमान मंदीरात काकड आरती



■ महासागर प्रतिनिधी
**वाडी, दि. २६ :** येथील शाहू लेआऊट मधील हनुमान मंदीरात पहाटे ५ वाजता काकड आरतीचा गजर सुरू होतो. काही अंभगाचे सादरीकरण मंदीरात केल्यानंतर परिसरातुन दिंडी काढण्यात येते.पहाटेच्या वेळी काकड्याने ओवाळून देवाला जागविण्याची प्रथा म्हणजेच काकड आरती होय . ही प्रथा गेल्या अनेक वर्षापासून गावागावात सुरू आहे. काकड आरतीच्या निमित्त लोक एकत्रित येऊन भक्तीभावाने मंदिरात भजन पूजन करीत असल्यामुळे काकड आरती मधून समाजात एकतेची भावना रुजत असते असे मत महादेव कराडे यांनी व्यक्त केले.

ही काकड आरती त्रिपूर पोर्णिमेपर्यंत चालणार आहे. यावेळी विणेकरी नामदेव कामडी, गायन महादेव कराडे, ढोलक विजय घ्यार ,टाळकरी खुशालराव पाटील ,भिमराव धाडसे, सज्जनराव कनेरकर, गणपत वसाखे,शेषराव राऊत , पार्थ भट्टलवार, यश शेळके, नारायण भेंडे, लक्ष्मण यादव , पियुष धाडसे, प्रकाश देशमुख, कुसूम भेंडे, राजा भोज, छबी कराडे, वंदना कामडी, रेखा यादव, संगीता धाडसे, बेबी वसाखे,वीना आंबटकर, प्रमीला राजभोज, मोनिका राऊत, सेवीका राऊत, वंदना शिंदे, शालिनी देवरे, संध्या वाघमारे, मंगला भोंडे, ज्योती खोब्रागडे, ज्योत्सना सगणे, वाघ , अनंतवार, सावरकर, छाया उपरीकर, वीणा अंबाडकर, बानोकर, जागृती कराडे, अनीता उपरीकर, सीमा हारोडे, ज्योती शेलार, मंदा राऊत , लक्ष्मण यादव,मल्लेवार,आदींसह शेकडो नागरीक उपस्थित राहतात.

# ओटीपी आधारित सॅनिटरी नॅपकिन घरपोच सेवा

## महिलांच्या आरोग्य व स्वच्छतेसाठी एक मतयंत महत्वाचे पाऊल



■ **महासागर प्रतिनिधी , नागपूर, दि. २६ :** महिलांच्या आरोग्य व स्वच्छतेच्या क्षेत्रात ऐतिहासिक पाऊल उचलत नागपूर जिल्ह्यात देशातील पहिली ओटीपी आधारित सॅनिटरी नॅपकिन घरपोच वितरण व्यवस्था सुरू करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या ङ्गफ्री सॅनिटरी नॅपकिन वितरण योजनेङ्घ अंतर्गत 'स्माईल' या नावाने सुरू झालेल्या या प्रायोगिक उपक्रमाची अंमलबजावणी जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय, जिल्हा सामान्य रुग्णालय, नागपूर यांच्या माध्यमातून करण्यात येत आहे. या प्रकल्पासाठी एकूण २३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या उपक्रमाअंतर्गत रामटेक, पारशिवनी आणि मौदा तालुक्यांतील सुमारे एक लाख महिला आणि १० ते ५५ वयोगटातील किशोरींना या योजनेचा लाभ मिळणार आहे. प्रत्येक लाभार्थीला दर महिन्याला आठ सॅनिटरी नॅपकिन्सचा एक पॅक घरपोच दिला जाणार असून, वितरण स्थानिक प्रशिक्षित महिला स्वयंसेवकांमार्फत केले जाईल. वितरणाच्या वेळी लाभार्थींच्या मोबाईलवर ओटीपी पाठवला जाईल आणि तो टाकल्यावरच वितरण नोंद पूर्ण होईल. या सर्व प्रक्रियेचे निरीक्षण क्लाऊड-आधारितसॉफ्टवेअर प्रणालीद्वारे केले जाणार असून, वितरण, साठा, अभिप्राय आणि स्वयंसेवकांची कार्यक्षमता यांचा मागोवा घेण्यात येईल. सर्व डेटा सुरक्षित भारतीय सर्व्हरवर जतन केला जाईल, अशी माहिती आरोग्य विभागाने दिली आहे. या अभिनव उपक्रमाचा उद्देश ग्रामीण व उपनगरी भागातील महिलांपर्यंत सुरक्षित मासिक पाळी स्वच्छता उत्पादने पोहोचवणे हा आहे.वर्ल्ड बँकच्या अहवालानुसार जगभरातील सुमारे ५० कोटी महिलांना पुरेशी मासिक पाळी स्वच्छता सुविधा उपलब्ध नाहीत. भारतात केवळ ४२ टक्के ग्रामीण मुली स्वच्छ उत्पादने वापरतात, तर २२ टक्के मुली अद्याप अस्वच्छ साधनांचा वापर करतात, ज्यामुळे संसर्ग आणि शाळा बुडवण्याचे प्रमाण वाढते. या योजनेद्वारे नागपूर जिल्हा तंत्रज्ञान, सन्मान आणि आरोग्य सक्षमीकरणाचा संगम साधत देशासाठी नवे आदर्श निर्माण करत आहे. प्रकल्प यशस्वी झाल्यास लवकरच संपूर्ण राज्यभर ही योजना विस्तारली जाण्याची शक्यता आहे.

# मनपा प्रशासन व कंत्राटदारावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा

# माजी नगरसेवक भाजपा प्रदेश उपाध्यक्ष ऍड. धर्मपाल मेश्राम यांची मागणी

■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर, दि. २६ :**

नागपूर महानगरपालिकेच्या अंतर्गत आर्यन पम्प्स अँड एन्व्हायरो सोल्यूशन प्रा.लि. येथे हेल्पर पदावर कार्यरत पवन चंद्रशेखर वरतकर या कर्मचाऱ्याचा प्रशासकीय हलगर्जीपणामुळे मृत्यू झाला. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी व मलवाहिनी साफ करण्याच्या या कामातील संबंधित कंत्राटदार आर्यन पम्प्स अँड एन्व्हायरो सोल्यूशन कंपनी व नागपूर महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी यांचेवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी माजी नगरसेवक तथा भारतीय जनता पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष ऍड. धर्मपाल मेश्राम यांनी केली आहे. पवन चंद्रशेखर वरतकर या कर्मचाऱ्याच्या मृत्यू संदर्भात त्यांनी पोलीस उपायुक्त निकेतन कदम यांच्याशी भ्रमणध्वनीवरून संवाद साधला व घडलेल्या गंभीर प्रकरणाची सखोल चौकशी करत गरीब मृतकाच्या परिवारावाला न्याय देण्याची मागणी केली.

नागपूर महानगरपालिका अंतर्गत आर्यन पम्प्स अँड एन्व्हायरो सोल्यूशन प्रा.लि. ही कंत्राटदार कंपनी मलजल वाहिनी साफ करण्याचे कार्य करते. मलजल साफ केल्यानंतर शहर क्षेत्रात दूर टाकी रिकामी केली जाते. या वाहनावर हेल्पर पदावर पवन वरतकर कार्यरत होता. दि. २५ ऑक्टोबर ला नागपूर महानगरपालिका क्षेत्राबाहेर वाठोडा पोलीस स्टेशनच्या हद्दीत तरोडी येथील एफएलडी हॉटेल जवळून पवन वरतकर यांना त्यांच्या सहकाऱ्यांनी सक्करदरा पोलीस स्टेशनच्या हद्दीत दिघोरी येथील यश हॉस्पिटलमध्ये आणले. हॉस्पिटल प्रशासनाने त्यांना भरती केले.

मात्र आता हॉस्पिटल प्रशासन पवन वरतकरचा हॉस्पिटलमध्ये आणण्यापूर्वीच मृत्यू झाला असल्याचे सांगत आहे. एकूणच या संपूर्ण प्रकरणात महानगरपालिका प्रशासन, आर्या कंपनी सोबतच यश हॉस्पिटल प्रशासनाची भूमिका देखील संशयास्पद आहे. ज़र मृतक पवन हॉस्पिटल मध्ये भरती करण्यापूर्वी मरण पावल्याची बतावणी हॉस्पिटल प्रशासन करत आहे, तर त्याला कोणाच्या सांगण्यावरून व कसे भर्ती करून घेतले ? असा प्रश्न उपस्थित करत हॉस्पिटल प्रशासनाची देखील सखोल चौकशीची मागणी त्यांनी केलेली आहे. नागपूर महानगरपालिकेचा आर्या कंपनीसोबत करार झाला त्यात त्यांनी मल टाकी शहर क्षेत्राबाहेर रिकामी करण्याचे नमूद केले आहे का ? किंवा कोणत्या पद्धतीच्या अटी शर्थीवर करारनामा मनपा प्रशासनाने सही केला ?, कोणत्या अधिकार्याने तो सही केला ? असे प्रश्न उपस्थित करत कंपनीने कुणाच्या सांगण्यावरून शहर हद्दीबाहेर तरोडी येथे टाकी रिकामी केली. त्यांना महानगरपालिका प्रशासनातील कोणत्या अधिकाऱ्यांचे अभय आहे. महत्वाचे म्हणजे मनपा आणि आर्या कंपनी यांच्याकडून संगनमताने सुरु असलेल्या या प्रतापात सर्वसामान्य जनतेच्या जीवाशी खेळ होतो आहे, त्याची जबाबदारी कोण घेणार, असे सर्व प्रश्न करीत ऍड. धर्मपाल मेश्राम यांनी या सर्व प्रशांच्या अनुषंगाने पवन वरतकर च्या मृत्यूची सखोल चौकशी करणे आणि त्यांच्या कुटुंबातील एका सदस्याला नागपूर महानगरपालिकेमध्ये स्थायी नोकरी देण्यासह तो परिवारात एकटा कमावता असल्याने त्याच्या परिवाराला भराव आर्थिक मदत करण्याची मागणी केली आहे.

## जीडब्ल्यूसीईटीच्या चेतना चव्हाणचे सुयश



**नागपूर:** गोविंदराव वंजारी अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या ( जीडब्ल्यूसीईटी ) व्यवस्थापन अध्ययन व संशोधन विभागातील एमबीए विद्यार्थीनी चेतना चव्हाण हिने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या परीक्षेत नववा क्रमांक पटकावून महाविद्यालयाचा गौरव वाढविला आहे. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सलीम चव्हाण आणि विभागप्रमुख डॉ. पायल पाशिने यांनी चेतना हिचे अभिनंदन केले. तिच्या या कामगिरीत उत्कृष्टशैक्षणिक वातावरण आणि सक्षम मार्गदर्शनाचा मोठा वाटा असल्याचे त्यांनी नमूद केले. या आनंददायी प्रसंगी एमबीए विभागात फ्रेशर्स पार्टी तसेच प्राध्यापकांनी लिहिलेल्या पुस्तकाचे प्रकाशन सोहळाही पार पडला. महाविद्यालयाचे यशस्वी नेतृत्व आमदार ॲड. अभिजित वंजारी (सचिव, अमर सेवा मंडळ) आणि डॉ. स्मिता वंजारी (सिनेट सदस्य, आरटीएमएनयू व खजिनदार, अमर सेवा मंडळ) यांच्या मार्गदर्शनाखाली होत असून, संस्थेने व्यवस्थापन शिक्षण क्षेत्रात आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे.


**ANGEL ONE LIMITED**
Regd. Off: 601, 6th Floor, ACKRUTI STAR, CENTRAL ROAD, MIDC, ANDHERI EAST, MUMBAI -400093
Centralized desk : 18001020 Email id : support@angelone.in
Member of : NSE / BSE / BSE REMISIER / MCX / MCX SX / NCDEX
Member IDs: NSE : 12798, BSE : 612, MCX : 12685,
NCDEX : 00220 SEBI Registration No: INZ000161534

**NOTICE**

This is to inform all concerned that we have initiated the process of cancellation of registration of our below mentioned Authorised Person (AP) due to regulatory reasons/concerns.

| Name Of Authorised Person | Trade Name of AP | Address of AP | AP Registration No. |
|---|---|---|---|
| MANISHA DIPESH POUNIKAR | MANISHA DIPESH POUNIKAR | PLOT NO 143 C NEAR NIT GARDEN,RAMNA MAROTI NAGAR, HANUMAN NAGAR NEAR NIT GARDEN,NAGPUR 440009 MAHARASHTRA | NSE : AP0397434901 |

Any person dealing with the above-mentioned Authorised Person henceforth shall do so at their own risk. **ANGEL ONE LTD.** shall not be liable for any dealings with the said entity post the issuance of this notice. Investors having any queries or concerns regarding this matter are requested to contact **ANGEL ONE LTD.** within **15 days** from the date of issuing this notice.

Date : 27.10.2025
Place : Maharashtra

For ANGEL ONE LTD
Sd/-, Authorised Signatory

# जागतिक दृकश्राव्य वारसा दिन : समाजाच्या सामाजिक-सांस्कृतिक स्मृतींचे संवर्धन

२७ ऑक्टोबर हा दिवस दरवर्षी जगभरात जागतिक दृकश्राव्य वारसा दिन (World Day for Audiovisual Heritage)म्हणून साजरा केला जातो. या दिवसाची स्थापना युनेस्कोने २००५ साली केली. त्यामागचा प्रमुख हेतू म्हणजे मानवजातीच्या दृकश्राव्य वारशाचे संवर्धन, संरक्षण आणि पुनरुज्जीवन करणे. चलचित्रे, ध्वनिमुद्रिका, रेडिओ कार्यक्रम, दूरदर्शन वार्तापत्रे, माहितीपट, लोककलेवरील दृश्य-दस्तऐवज, डिजिटल संग्रह हे सर्व मानवाच्या सामाजिक प्रवासाचे मौल्यवान दस्तऐवज आहेत. आधुनिक समाजातील संवाद, विचार, भावभावना, संस्कृती, आणि सामाजिक परिवर्तन यांचे प्रतिबिंब या दृकश्राव्य माध्यमांमध्ये दिसते. त्यामुळे या वारशाचे जतन करणे हे केवळ सांस्कृतिकच नव्हे, तर सामाजिक ओळख जपण्याचे कार्य आहे.

दृकश्राव्य वारसा म्हणजे केवळ कलात्मक निर्मिती किंवा मनोरंजनाचे साधन नव्हे; तो समाजाच्या स्मृतींचा आणि अनुभवांचा भांडार आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, प्रत्येक समाजाची ओळख ही त्याच्या सांस्कृतिक स्मृतींवर आधारित असते. ज्या समाजाने आपला वारसा जतन केला नाही, तो समाज कालांतराने विस्मृतीत जातो. दृश्य आणि श्राव्य माध्यमे ही स्मृतींची सजीव रूपे आहेत. १९व्या शतकाच्या उत्तरार्धात छायाचित्रण आणि चलचित्रांचा उदय झाला. २०व्या शतकात रेडिओ, टेपरेकॉर्डर, दूरदर्शन आणि नंतर संगणक व इंटरनेट या नव्या माध्यमांनी मानवी संवादपद्धतीत आमूलाग्र बदल घडवले. या सर्व माध्यमांनी इतिहासाचे, संस्कृतीचे आणि सामाजिक परिवर्तनाचे चित्रण केले, परंतु त्याच वेळी त्यांचे संवर्धन न झाल्यास ते नष्ट होण्याचा धोका निर्माण झाला. म्हणूनच युनेस्कोने जगभरातील दृकश्राव्य वारसा जतन करण्याचे आवाहन केले आहे.

समाजाच्या इतिहासाचे आणि संस्कृतीचे जतन हे फक्त पुस्तकांद्वारे शक्य नाही; दृकश्राव्य माध्यमे त्या अनुभवांना जिवंत ठेवतात. भारतातील सामाजिक आणि सांस्कृतिक प्रवासाचा विचार केला तर १९१३ साली दादासाहेब फाळके यांनी तयार केलेला राजा हरिश्चंद्र हा चित्रपट भारतीय दृकश्राव्य वारशाचा प्रारंभबिंदू ठरला. या चित्रपटाने केवळ भारतीय चित्रपटसृष्टीची सुरुवात केली नाही, तर समाजातील नैतिक मूल्यांची अभिव्यक्तीही केली. पुढील काळात स्वातंत्र्यसंग्राम, राष्ट्रनिर्मिती, ग्रामीण पुनर्रचना, औद्योगिकीकरण, स्त्री-पुरुष समता, जातीविरोधी चळवळी आणि सामाजिक न्याय या विषयांवर तयार झालेल्या चित्रपटांनी आणि रेडिओवरील कार्यक्रमांनी भारतीय समाजाचा जिवंत इतिहास निर्माण केला. आकाशवाणी, दूरदर्शन, वृत्तपट आणि माहितीपट हे समाजाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाचे साक्षीदार ठरले.

समाजशास्त्राच्या दृष्टीने दृकश्राव्य वारसा हे सामाजिक परिवर्तनाचे आणि सामूहिक स्मृतींचे शक्तिशाली माध्यम आहे. दृश्य आणि श्राव्य साधनांद्वारे समाज स्वतःची ओळख निर्माण करतो, बदलत्या मूल्यांना प्रतिसाद देतो आणि सामाजिक वास्तवाचे प्रतिबिंब दाखवतो. समाजशास्त्रज्ञ मॉरिस हाल्बवाच्स (Maurice Halbwachs) यांनी मांडलेल्या सामूहिक स्मृती (Collective Memory) या संकल्पनेनुसार, समाजाचे अस्तित्व हे त्याच्या सामूहिक स्मृतींवर आधारित असते. त्या स्मृती दृकश्राव्य माध्यमांद्वारे जिवंत राहतात. एखाद्या समाजाने आपल्या भूतकाळातील अनुभव, संघर्ष, विचार, आणि भावनिक क्षण जतन केले, तर तो समाज आपली ओळख टिकवू शकतो. परंतु ही स्मृती नष्ट झाली, तर समाज आपल्या मूळपासून तुटतो. त्यामुळे दृकश्राव्य वारसा जतन करणे म्हणजे सामूहिक स्मृतींचे संरक्षण होय.

दृकश्राव्य साधनांचे समाजशास्त्रीय महत्त्व यामध्ये तीन पैलू आहेत. पहिला म्हणजे संस्कृतीचे संवर्धन. लोककला, पारंपरिक गाणी, नृत्य, नाटक, लोककथा, बोलीभाषा आणि लोकगीतांच्या ध्वनिमुद्रिका समाजाच्या सांस्कृतिक अस्तित्वाचे प्रतीक आहेत. महाराष्ट्रातील भारूड, लावणी, तमाशा, गोंधळ, कीर्तन आणि लोकनाट्य या परंपरांचे जतन केवळ लिखित स्वरूपात नव्हे तर दृकश्राव्य माध्यमांतून होणे आवश्यक आहे. दुसरा पैलू म्हणजे इतिहासाचे दस्तऐवजीकरण. चित्रफिती, रेडिओ भाषणे, माहितीपट आणि वार्तांकन ही समाजातील बदलांची नोंद ठेवतात.



डॉ. राजेंद्र बगाटे

महात्मा गांधीजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे, स्वातंत्र्यसंग्रामातील चलचित्रे, स्वातंत्र्यानंतरची दृश्ये, किंवा ग्रामीण विकासाच्या योजनांवरील माहितीपट ही सर्व उदाहरणे समाजाच्या ऐतिहासिक आणि राजकीय प्रवासाचे पुरावे आहेत. तिसरा पैलू म्हणजे सामाजिक परिवर्तनाचे प्रतिबिंब. चलचित्रे आणि रेडिओ कार्यक्रमांनी स्त्रीवाद, जातीय विषमता, आर्थिक विषमता, शिक्षण आणि पर्यावरण यांसारख्या विषयांवर चर्चा घडवली. सत्यजित रे, बिमल रॉय, श्याम बेनेगल यांसारख्या दिग्दर्शकांच्या कलाकृती समाजातील संघर्ष आणि परिवर्तनाचे समाजशास्त्रीय विश्लेषण साकार करतात.

तथापि, या मौल्यवान वारशासमोर गंभीर आव्हाने उभी आहेत. दृकश्राव्य सामग्री जतन करणे हे तांत्रिक दृष्ट्या आणि आर्थिकदृष्ट्या अत्यंत गुंतागुंतीचे कार्य आहे. जुने चित्रपट सेल्युलॉईड फिल्मवर बनलेले असल्याने ते रासायनिक प्रक्रियेमुळे नष्ट होतात. ध्वनिमुद्रिका, टेप्स आणि व्हिडिओ कॅसेट्स कालांतराने खराब होतात. अनेक मौल्यवान चलचित्रे आणि रेडिओ कार्यक्रम आज कायमचे हरवले आहेत. युनेस्कोच्या २०२३ च्या अहवालानुसार, जगभरातील सुमारे ४४ टक्के दृकश्राव्य संग्रह नष्ट होण्याच्या धोक्यात आहेत. भारतातही अशीच स्थिती असून, राष्ट्रीय चलचित्र संग्रहालय (), प्रसार भारती, आणि भारतीय राष्ट्रीय ध्वनिचित्र संसाधन केंद्र या संस्था डिजिटल माध्यमांतून या वारशाचे पुनरुज्जीवन करण्याचे प्रयत्न करत आहेत. तथापि, या प्रक्रियेत अनेक अडचणी आहेत, निधीअभाव, तांत्रिक उपकरणांचा अभाव, प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे लोकजागरूकतेचा अभाव. सामान्य जनतेला या वारशाचे महत्त्व फारसे ठाऊक नाही. लोक आपल्या दैनंदिन जीवनातील जुन्या ध्वनिमुद्रिका, छायाचित्रे, नाटकांची रेकॉर्डिंग्ज किंवा गावातील लोककलेचे व्हिडिओ जतन करत नाहीत. परिणामी, अनेक मौल्यवान सांस्कृतिक घटक कालांतराने हरवतात. हे सांस्कृतिक विस्मरण समाजाच्या सामूहिक स्मृतींना गळ लावते. आजच्या डिजिटल युगात दृश्य-श्राव्य सामग्रीची निर्मिती प्रचंड प्रमाणात होत आहे. प्रत्येकजण आपल्या मोबाईल फोनवर व्हिडिओ तयार करतो, आवाज रेकॉर्ड करतो, आणि सोशल मीडियावर शेअर करतो. परंतु ही सामग्री क्षणभंगुर असते. काही दिवसांत ती नष्ट होते, डिलीट होते किंवा सर्व्हर क्रॅशमुळे हरवते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, ही डिजिटल विस्मृती आपल्या काळाची एक नवी शोकांतिका आहे. भविष्यकालीन संशोधकांना आजचा काळ समजून घ्यायचा असल्यास या काळातील दृश्य-श्राव्य नोंदी आवश्यक असतील. त्यामुळे डिजिटल सामग्रीचे दस्तऐवजीकरण आणि सुरक्षित संग्रहण हे आज अत्यंत गरजेचे आहे.

युनेस्कोमार्फत २००५ मध्ये २७ ऑक्टोबर हा दिवस अधिकृतपणे जागतिक दृकश्राव्य वारसा दिन म्हणून घोषित करण्यात आला. युनेस्कोच्या "Memory of the World Programme" या उपक्रमांतर्गत जगभरातील मौल्यवान दृकश्राव्य कागदपत्रांचे डिजिटल स्वरूपात संवर्धन केले जाते. भारतातील महात्मा गांधींजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चित्रफिती, भारताच्या स्वातंत्र्य चळवळीवरील ध्वनिमुद्रिका, आणि आकाशवाणी वारसा संग्रह हे या कार्यक्रमाचा भाग आहेत. या प्रयत्नांमुळे समाजातील ऐतिहासिक आणि सांस्कृतिक घटक पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचतील.

भारतात सरकारने २०१७ मध्ये National Digital Preservation Programme सुरू केले, ज्याद्वारे देशातील दृकश्राव्य वारशाचे डिजिटल जतन करण्याचे उद्दिष्ट आहे. नॅशनल फिल्म आर्काईव्ह ऑफ इंडिया (NFAI) ने अनेक चित्रपटांचे पुनरुज्जीवन केले आहे. तसेच Film Heritage Foundation, Indira Gandhi National Centre for the Arts आणि विविध विद्यापीठेही या क्षेत्रात कार्यरत आहेत. आकाशवाणी आणि दूरदर्शनने आपल्या जुन्या ध्वनिमुद्रिका आणि कार्यक्रमांचे डिजिटल रूपांतरण सुरू केले आहे. परंतु ग्रामीण आणि स्थानिक लोककलेवरील ध्वनिचित्र नोंदी अजूनही अपुऱ्या आहेत. त्यामुळे राज्यस्तरावर आणि स्थानिक पातळीवर ग्रामीण व आदिवासी संस्कृतीचे दस्तऐवजीकरण आवश्यक आहे.

शैक्षणिक क्षेत्रात दृकश्राव्य वारशाचे महत्त्व अपार आहे. शिक्षण प्रक्रियेत दृकश्राव्य माध्यमांचा वापर विद्यार्थ्यांना समाज आणि संस्कृती समजून घेण्यासाठी प्रभावी ठरतो. इतिहास, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, आणि लोकसंस्कृतीच्या अभ्यासात चलचित्रे आणि ध्वनिमुद्रिका या संशोधनाच्या प्रमुख साधनांपैकी एक आहेत. त्यामुळे दृकश्राव्य वारशाचे जतन हे शिक्षणक्षेत्रातील गुंतवणुकीचा भाग असला पाहिजे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, दृकश्राव्य वारसा म्हणजे समाजाच्या आत्म्याचे दृश्य-श्राव्य प्रतिबिंब आहे. तो समाजाच्या भावनांचा, संघर्षांचा आणि आकांक्षांचा साक्षीदार आहे. आपण जर या वारशाचे जतन केले नाही, तर आपल्या संस्कृतीची आणि सामाजिक ओळखीची मुळे हरवतील. २७ ऑक्टोबरचा हा दिवस आपल्याला स्मरण करून देतो की स्मृतींचे जतन म्हणजेच संस्कृतीचे रक्षण आणि संस्कृतीचे रक्षण म्हणजेच समाजाचे अस्तित्व टिकवणे.

आज आपल्यासमोर सर्वात मोठे आव्हान म्हणजे या वारशाबद्दल जागरूकता निर्माण करणे. प्रत्येक नागरिकाने आपल्या घरातील, गावातील, किंवा संस्थेतील जुने ध्वनिचित्र दस्तऐवज जतन करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. प्रत्येक राज्याने आणि शैक्षणिक संस्थांनी स्थानिक पातळीवर दृकश्राव्य वारसा संकलन केंद्रे स्थापन करणे आवश्यक आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून हे केवळ सांस्कृतिक उपक्रम नसून सामाजिक जबाबदारीचे प्रतीक आहे. कारण समाजाची ओळख त्याच्या स्मृतींवर उभी असते, आणि या स्मृतींची जपणूकच त्याच्या टिकाऊ अस्तित्वाची हमी देते. म्हणूनच, जागतिक दृकश्राव्य वारसा दिन हा केवळ औपचारिक सण नसून आपल्या सामूहिक स्मृतींचे जतन करण्याची आणि समाजाच्या सांस्कृतिक ओळखीचे रक्षण करण्याची आठवण करून देणारा दिवस आहे. आपण या वारशाचे संवर्धन केले तर आपल्या पुढील पिढ्यांना इतिहासाचा, संस्कृतीचा आणि मानवी समाजाच्या उत्क्रांतीचा खरा अनुभव घेता येईल. हा वारसा म्हणजे आपली ओळख, आपली स्मृती आणि आपला आत्मा होय, जो प्रत्येक समाजाच्या अस्तित्वाचा आधार आहे.

# संत शिरोमणी नामदेव महाराज

संत शिरोमणी नामदेव महाराज यांची काल २६ ऑक्टोबर रोजी जयंती होती. संत शिरोमणी नामदेव महाराज यांचा जन्म २६ ऑक्टोबर १२७० रोजी हिंगोली जिल्ह्यातील नरसी गावात एका गरीब शिंपी कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाम दामाशेठी तर आईचे नाव गोनाई असे होते. त्यांना एक बहिणही होती तिचे नाव आऊबाई असे होते. वयाच्या ११ व्या वर्षी त्यांचा विवाह राजाबाईशी झाला. त्यांना चार मुले व एक मुलगी होती. मुले, मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार असणारे नामदेव महाराज मात्र विठ्ठल भक्तीत लिन असायचे. लहानपणापासूनच नामदेव विठ्ठलमय झाले होते. विठ्ठल हेच त्यांच्यासाठी सर्वकाही होते. देव, आईबाप, गुरू, सखासोयरा, स्वामी तोच होता. विठ्ठल भक्तीत ते इतके लिन असायचे की साक्षात विठ्ठल त्यांना भेटायला यायचे असे म्हटले जाई. त्यांच्या हट्टापायी विठ्ठलाने त्यांच्या घरी येऊन दुधाच्या नैवेद्याचे सेवन केले होते अशी आख्यायिका प्रसिद्ध आहे. एकदा एका कुत्र्याने त्यांच्या घरी येऊन रिकामी वाटी पळवली तेंव्हा तेंव्हा कुत्र्याला भूक लागली असून वाटीत तर काहीच नाही म्हणून ते कुत्र्याच्या मागे सुकी भाकर आणि तुपाची वाटी घेऊन त्याला देण्यासाठी त्याच्या मागे धावत होते. लहानवयातच सर्वांभूती परमेश्वर ही भावना त्यांच्यात दिसून आली. लहानपणापासूनच विठ्ठलाचे भक्त असलेल्या नामदेवांनी सत्य समजून घेण्यासाठी वेदज्ञ ब्राह्मणांकडे हेलपाटे मारले पण नामदेव हे शूद्र जातीचे असल्याने त्यांना ब्रह्म जाणून घेण्याचा अधिकार नाही असे सांगून त्यांना ज्ञान घेण्यापासून रोखण्यात आले. तेंव्हा त्यांनी भक्तीतून थेट परमेश्वरलाच आधार मानून स्वतःच बुद्धीचा कस लावत विश्वाचे सत्य समजून घेण्याचा प्रयत्न केला. त्याचाच एक भाग म्हणून ते लंगोटी नेसून चंद्रभागेच्या वाळवंटात कीर्तन करत सदविचारांचा प्रसार करू लागले. ही वाट त्यांना स्वतःच शोधायची होती. त्यातून साधनेची नवीनवी साधनं निर्माण होऊ लागली. श्रोत्यांनाही समजून घेणारी वारकरी सामूहिक कीर्तनाची मुहूर्तमेढ त्यांनीच रोवली. त्यासाठी त्यांनी अभंग या छंदाची निर्मिती केली. नामदेवांनीच वारकऱ्यांच्या लाडक्या काल्याच्या कीर्तनाची सुरुवात केली. नामदेव महाराजांना अभंग लेखनाचा इतका छंद जडला की त्यांनी जवळपास १ कोटी अभंग लिहिले. याचाच अर्थ त्यांनी विपुल साहित्य लेखन केले. त्यांच्या साहित्याची भाषा खूप सोपी होती. ज्ञानेश्वर, मुक्ताबाई, चांगदेव या त्यांच्या समकालीन संतांच्या तुलनेत आज आपल्याला त्यांची भाषा लगेच कळते. त्यांनी कायम सर्वसामान्यांसाठी लिहिले. त्यात संवाद आहे. नाट्य आहे. लोककलांचे विविध प्रकार आहे. ज्ञानेश्वरांच्या समाधी नंतरही नामदेवांनी तीर्थयात्रा करून रामेश्वरापासून मुलतान पर्यंतचा भारत पालथा घातला. जे जिथे गेले तिथले बनले. त्यांनी तिथल्या स्थानिक भाषेत लोककाव्य लिहिले. त्यांनी हिंदी साहित्याला नवा आयाम दिला. त्यांच्या कामातूनच पुढे रामानंद, कबीर, नानक, दादू दयाळ, मीरा, नरसी मेहता अशी संताची मांदियाळी देशभर उभी राहिली. पंजाबात तर ते दोन दशकांहून अधिक काळ राहिले. शीख धर्माच्या गुरु ग्रंथासाहेब या पवित्र ग्रंथात त्यांची ६१ पदे समाविष्ट आहेत. पंजाबात आजही त्यांच्या अभंगाचे नियमित वाचन केले जाते. पंजाबातच नाही तर संपूर्ण देशात त्यांना मानणारा मोठा वर्ग आहे. महाराष्ट्र आणि पंजाब बरोबरच राजस्थान, गुजरात, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, हरियाणा, उत्तराखंड, उत्तरांचल, हिमाचल प्रदेश या राज्यात त्यांची मंदिरे आहेत. तामिळनाडू पासून काश्मीरपर्यंत लाखो लोक त्यांचे नाव किंवा आडनाव किंवा जातीची ओळख अभिमानाने मिरवतात. संपूर्ण देशात प्रभाव असणारे नामदेव हे एकमेव संत आहेत म्हणूनच त्यांना संत शिरोमणी असे म्हणतात. ३ जुलै १३५० रोजी वयाच्या ८० व्या वर्षी अत्यंत समाधानाने आपला देह ठेवला. त्यांची एक समाधी पंढरपुरात विठ्ठलाच्या पायरीशी आहे तर दुसरी पंजाबमधील घुमान येथे आहे. या समाधीचे दर्शन घेण्यासाठी दररोज हजारो भाविक मोठ्या भक्तिभावाने या ठिकाणी येतात आणि नतमस्तक होतात.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# नियतीचा नटसम्राट !

घर देता का घर? या व्याकुळ अवस्थेत एक महानायक आपल्या आयुष्यातील शेवटच्या टप्प्यावर आपल्या पत्नीसह विनवणी करणारा एक बाप… अक्षरशः हताश होतो…. जो अनेक व्यासपीठ गाजवीत,असंख्य प्रेक्षकांच्या मनात घर करणारा कलाकार मात्र आपल्या कुटुंबातील सदस्यांनी दिलेल्या अनैसर्गिक वागणुकीतून आपलं दुःख व्यक्त करताना विनवणी चा प्रसंग बघतांना अक्षरशः डोळ्यात पाणी येत… ही कल्पना जरी मनात आली तरी अश्रूंचा बांध फुटावा इतका त्रास मनाला होतो जो व्यक्ती तहान भूक विसरून आपल्या कुटूंबातील सदस्यांच्या जीवनात आकार देतो तो जेव्हा खचतो तेव्हा मात्र आपल्या डोळ्यांत व हृदयात अतीव दुःख होतांना चा हा प्रसंग भावविवश केल्याशिवाय राहत नाही जो कुसुमाग्रज यांच्या लेखणीतून साकारत असतांना नटसम्राट,असा नट होणे नाही या भूमिकेला न्याय देणारे अभिनेता नाना पाटेकर यांनी मात्र प्रेक्षकांची मने जिंकतो… साहजिकच हा नटसम्राट आपल्या अवती भवती समाजात अनेक ठिकाणी बघायला मिळतो तेव्हा ह्या समाजातील अनेक व्यक्तींची कीवही येते व तितकिच घृणा ही येते

गेल्या चाळीस वर्षाच्या आपल्या रंगभूमीवर अधिराज्य गाजविणाऱ्या ह्या कलाकार रंगभूमीतून निवृत्त होतांना आपल्या कुटूंबासोबत मित्र परिवारात अत्यन्त आनंदित होऊन हा अभिनयाचा मोठया मनाचा राजा आपलं स्वतःच घर हे मुलाच्या नावावर व उरलेली संपत्ती ही मुलीच्या नावावर करून आपल्या अभिनयाच्या कहाण्या व आपला रंगमंच त्याचे किस्से गिरवत असतांना आयुष्यतील शेवटच्या टप्प्यावर असा काही अनुभव येईल याचा थांगपत्ता नसलेला हा नटसम्राट…..! आयुष्यतील खऱ्या जीवनाचा रंगमंच हाताळताना पत्नी चा हाथ हातात धरून आपल्या व्यता दुःख व्यक्त करताना किंचितही मुलांवर रोष व्यक्त न करता निघून जातो स्वतःच्या या घरट्यातून रात्रीच्या त्या काळोखात ,प्रचंड विजेच्या गडगडातात स्वतःच्या आठवणी ते किस्से मनात व अश्रु नयनाणे थकलेल्या या पावलांच्या जोरावर स्वाभिमानी नटसम्राट निघतो ….दूरवर ….जगावं की मरावं हा एकच प्रश्न घेऊन? ह्या दुनियेच्या उकिरड्यावर खरकट्या पत्रावलीचा तुकडा होऊन ..जगावं बेशरम लाचार आनंदानं? का फेकून द्यावा देहाच लखतर मृत्यूच्या काळ्याशार डोहामध्ये? आणि करावा शेवट सर्वांचा एकाच प्रहराने?

ही बोलण्याची परिस्थिती येणे म्हणजे कर्तव्यं शून्य ,औलाद व उपकाराची जाण नसलेली पिढी यामुळे जीवनाच्या आनंदमयीं अंतिम टप्प्यावर नरक यातना मनाला व शरीराला देणारी वंशाचे दिवे हवे कश्याला? त्या पेक्षा नसलेली बरी ….

माझा तुझा ह्याचा अन त्याचाही

मृत्यूच्या महासर्पाने जीवनाला असा डंख मारावा…

असा विचार व्यक्त करताना हा नायक मनाने खचून आपल्या या जीवनाला लाचारी , बेशरम मानू की शेवट व्हावा जगण्याचा तुझ्या व माझ्या साक्षीने ….

अभिनयाची सवय असणारा हा कलाकार मात्र वैयक्तीक जीवनात पारिवारिक एकटेपणाचा बळी होताना या खऱ्या खुऱ्या पात्राला न्याय न देता थेट परमेश्वर राला विनवणी करतो इतका मनावर घाला घालणारे खरचं आपली जणपत वाटत नाही इतकी क्रूर वागणारी ही पिढी आपलीच का ? हा प्रश्न मात्र नियतीच्या पुढे मांडतांना कित्येक उन्हाळे पावसाळे पाहणारा हा नटसम्राट तुटुन जातो कलाकाराचं जीवन हे कौटुंबिक त्याग व सातत्यपूर्ण अभिनयाची जोड यावर असताना आपला परिवार आपल्या पत्नी च्या हवाली करून कौटूंबिक गरजा जवाबदारी पार पाडत ओढ ताण करीत दोन्ही बाजूंना जिंकणारा हा नटसम्राट मात्र वार्धक्य काळात आपल्याच कुटुंबातील मुलांनी दिलेल्या हीन वागणुकीतून जीवनाचा शेवट का करु नये यासाठी थेट परमेश्वराला साद घालतो खूप वाईट वेदना ह्या मनाच्या हृदयाच्या मानसिकतेला विवस करतातयात पुढे प्रतिष्ठा म्हणजे भाकड ओझं आहे कधी योग्यता नसतांना मिळते तर कधी चूक नसताना निघून जाते असाही विचार कलाकार करतो

जो माय बापाच्या जीवावर आसेतु हिमालय प्रगतीची गरुड झेप घेतो तेव्हा मात्र आपल्या पंखांना बळ शक्ती देणारे हे नटसम्राट मात्र आपल्या आयुष्यची सांज एकटेपणा विवंचना, आठवण, चिंता व पसच्यातापयात घालवून वृद्धाश्रम किंवा केअर टेकर यांच्या भिस्तीवर जगतांना आज आपण समाजात पहात आहोत

मानवी आयुष्य हे क्षणभंगुर आहे इथे कुणाचाच भरवसा नाही नाती ही जिवंतपणी सांभाळली, जोपासली, रुजविली, निभावली, तर मनाच्या कप्प्यात व देवाच्या नजरेत आपण धन्य झालो असे आहे, जीवंतपनी केलेली मातृ पितृ सेवा , वृद्धसेवा ही चारधामच्या पुण्यापेक्षा, मृत्यूनंतर केलेल्या पूजा अर्चा, पेक्षा कोटी कोटी पट फलदाही आहे नंतर केलेली बुवाबाजी ही निव्वळ थोतांड, कर्मकांड, व समाजाला दाखवत असलेली देखावा आहे

जिवंतपणी नुसता त्रास करून सन्मानाने वागणूक न देता मग तिसरा दिवस, दसवा, तेरवी, चौदावि, पिंडदान वर्षश्राद्ध, करून मोकळे व्हायचे व काही अनुचित घडले की पितरांना दोषी ठरवायचे, मग पूजा अर्चा करून सर्व ठीक असा समज … प्रथा थोडक्यात केल्या तरी चालतील पण जिवंतपणी व म्हातारपणी केलेली सेवा ही सर्वश्रेष्ठ आहे थोर संत गाडगेबाबा राष्टसंत तुकडोजी महाराज यांनि संपूर्ण जीवन लोकांचे डोळे हे आपल्या प्रबोधन व कीर्तनातून समाजाला जागृत केले

जीवनात सर्वोत्तम धन म्हणजे संस्कार आहेत ज्या परिवारातील मुलांना लहानपणी पासून योग्य मूल्यशिक्षण, संस्कार, नात्यातील ओलावा समजला त्या परिवारात शेवटपर्यंत एक नाळ जुळते…. मुलं कीतीही म्हणत असली तरी त्यांच्या स्वाधीन पूर्ण संपत्ती करून मोकळं होऊ नये ही नटसम्राट ह्या चित्रपटात दाखवतांना जीवनात उतार वयात किती कलाटणी मिळते हेही आपण पाहिलं आहे… संपत्ती पैसा घर ही पुढच्या पिढीला नक्कीच मिळतेच ती सोबत घेऊन जाण्याची काही व्यवस्था नाही म्हणून प्राण असे पर्यंत त्या संपत्तीला पूर्ण सुपूर्द करून मोकळं न होता आपल्या मुलाबाळांच्या सोबत आनंदाने जगण्यासाठी आपली औलाद ही सुरवातीपासून विचारी, परोपकारी, कृतज्ञ कशी घडतील या साठी कायम प्रयत्नशील राहील पाहिजे कारण आपली मुलं हीच आपली संपत्ती ,तेच आपले कर्तेधरते अगदी शेवटचा स्वासा पर्यंत ….नाहीतर आपलाही नटसम्राट होऊन दुःख वाट्याला येईल का असा विचार मनात घर करेल!



उमेश ज्ञानेश्वर ईखे
कृष्णा विहार, नागपूर
९५१८५७११३८
ikhe.soil@gmail.com

# खरेदीला जातांना…!

खरचं आपल्याला खुप आनंद होत आहे कारण भूतकाळातील इतिहासापेक्षा भविष्यकाळाची स्वप्ने मला अधिक आवडते कारण यशस्वी होण्याचा सर्वात खात्रीदायक मार्ग म्हणजे जीवनात सकारात्मकेता अवलंब करून समाजातील लोकांना आनंद मिळुन देणे होय. आता लवकरच दिवाळी, संक्रांत व इतर सणासुदीचे दिवस असल्यामुळे पूर्ण भारत देशात आनंदमय दिवस येत असल्याचे जाणवते. या निमित्याने आपण सर्व सण मोठया आनंदान उडया मारत मारत साजरा करतो आणि खुप भरमसाठ खरेदी करण्यासाठी घरातुन बाहेर निघतो. हे सगळ्यांचे होते. माझे पण होत आहे. पण सणासुदीच्या दिवसात खरेदीला जातांना काही महत्वाची खबरदारी वेळीच घेतलेली बरी राहील असे मला कटाक्षाने म्हणावे लागेल, कारण पैसा वर्तमानात फार महत्वाची बाब होवुन बसली आहे. पैषाचा पाऊस म्हणजे आनंदाची परवणीच म्हणावी लागेल.

किंबहुना आपण आयुष्यातील सामान्य गोष्टी असामान्य मार्गाने करतो तेव्हाच जगाचे लक्ष आपल्याकडे वेढले जातात. आपण पैषाचे महत्व महत्वाचे समजुन जाणले पाहीजे. या देषात लवकरच सरकारी / निमसरकारी व इतर नोकरी करणाया अधिकायांना तसेच कर्मचायांना भरघोश दिवाळीची सप्रेम भेट म्हणून बोनस रूपाने सरकार कडून बोनस रूपाने येत्या दिवसात मिळणार आहे हे निष्चितच आणि खरेदी पण भरपूर होणार आहे. पण, एकदा खिषातुन पैसा निघुन गेल्यावर खर्च झालेल्या पैषाचा पष्चाताप होवु नये म्हणुन पैषाचे महत्व ओघाने जाणले पाहीजे असे मला वाटते. त्याकरीता येत्या दिवसात आपण आनंदमय सोहळा / दिवाळी सण व इतर सण साजरा करण्यासाठी पैषे जास्त खर्च होवु नये याकरीता आपण, परिवार तसेच घरातील वृध्द म्हातारे आई वडिल समवेत इतर लहानग्या मुलानी पैषाचे महत्व समजुन खर्च आटोक्यात ठेवणे भविश्यकाळासाठी परवणीचीच बाब म्हणावी लागेल. त्याकरीता खालील बाबीवर लक्षपुर्वक लक्ष देणे महत्वाचे आहे. असे मी रास्तपणाने म्हणुया ?



१) सणासुदीच्या दिवसात मार्केटमध्ये आपल्याला प्रलोभनार्थ टाकेल असेच दुकान सजलेले असते हे आपल्याला मान्य करावे लागेल. याकरीता योग्य सामानाची यादी घरूनच बनविणे अगत्याचे आहे. जे सामान आपल्याला लागत आहे तेच आपण कृपया नमुद करावे जेणेकरून जास्तीचे सामान आणता कामा नये.

२) दुकानात प्रवेष केल्यानंतर दुकानदाराला आपण सामानाची यादी कृपया नाव लिहुन सुपुर्द करावी. जर आपल्याला सामानाचे नाव आठवत असेल तर कृपया आणखी लिहावे जेणेकरून सुचीच्या बाहेर सामान घेतल्यास आपला खर्च वाढण्याची शक्यता राहते. जे सामान आपल्याला आवष्यकच आहे तेच घ्यावे जेणेकरून आपला हिषोब आटोक्यात राहील. हे केल्यास आपला पैसा काही क्षणासाठी आपल्याजवळ राहील कारण दिवाळी झाल्यानंतर लगेच सर्दी पदसे व इतर किरकोळ आजारासाठी आपल्याजवळ खिषात पैसे असणे आवष्यक आहे.


३) आपल्याला या दिवसात सरकारकडून/ कार्यालयाकडून बोनस रूपाने जास्तीचा पैसा खर्च भेटवस्तु म्हणून आपल्याला मिळालेला असतो म्हणून की काय ? उथळ पैषाला खळखळात फार असतो जसे आपण खिषात हजार रूपये असेल तर आपण ७०० ते ८०० रूपयाचे फाटाके व इतर वस्तु घेण्यासाठी झटतो पण या दिवसात बोनस रूपाने १५ ते २० हजार रुपये मिळाल्यास खिषा पॉकेट गरम असल्याचे जाणवते म्हणून की काय रूपये ८०० ऐवजी आपण फटाके २००० ते ३००० हजाराचे घेतो ही बाब आपल्या भविश्याकरीता दयनिय म्हणावे लागेल. यावर आपण प्रष्न उपस्थित कराल कि दिवाळीच आहे म्हणून खर्च करावे नाही काय? हाच विचार आपल्याला स्वतःचा विकास खंडीत पडायला भाग पाडतो हे मात्र खरे यावर वर्तमानात तंत्र आधुनिक तंत्रज्ञानाच्या देषात कटाक्षाने महत्वाचे समजुन अत्यंत जाणिवपुर्वक गंभीरपणे पैषासचा जपवणुकीकडे लक्ष देण्याची मानवी समाजाला गरज आहे, असे नाही वाटत काय ?

४) आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळात लोकांना प्रलोभन दाखविण्यासाठी मोठ मोठे मॉल, डि मॅट व इतर मोठमोठी दुकान सजवुन निर्माण करतात कारण कोणताही व्यक्ती सजावट पाहुन दुकानात येईल पण आपण इथेच चुकतोच कारण जिवन म्हणजे स्वतः षोध घेणे नव्हे, तर जिवन म्हणजे स्वतः ला चांगल्या रितीने घडविणे होय कारण आमच्या परिस्थितीत आपल्याला गरज नसलेली वस्तु मोठ मोठया मॉल, डि मॅट व इतर प्रलोभने दाखवुन अनेक वस्तु कारण नसतांना आपल्या स्वतःच्या घरात येतात. त्यामुळे आपला हिषोब बिघडतो हे आपल्या सर्वांना जाणले पाहीजे. यादी नसतांना आपल्याकडे गरज नसतांना वस्तु घरात येतात त्यामुळे त्या वस्तुचा उपयोग देखल होत नाही. कालांतराने ती वस्तु काही दिवसात आपोआप उकीडयावर दिसते. हि आपल्यासाठी षोकांतिका नाही काय? यासाठी पैषाचे महत्व जाणुन खरेदीला जातांनी वेळीच खबरदारी घेतली पाहीजे असे मला वाटते.

जाता जाता आजच्या काळात पैषाला वारे माफ महत्व प्राप्त झाले आहे. पैसा वाचविण्याची बचत करण्याची इच्छा असेल तर कारण मी प्रारंभिक लक्ष देणे व इच्छाषक्ती प्रबळ असेल तर व आत्मविष्वास ही अषी षक्ती आहे की, जी तुम्हाला पायथ्यावरून यषाच्या षिखरावर पोहचवु शकते. त्याकरिता खरेदीला जातांना पैषाची कषी बचत होईल याचा विचार करणे वर्तमानात गरजेचे आहे. आपल्याला आदर्षापर्यंत जाण्यासाठी पैषाची बचत करणे यासारखे आपल्याला टोकाचे प्रयत्न करावे लागतील तरच आपल्याकडे पैसा बचतीकडे, काटकसरीकडे वेळीच लक्ष देणे व खरेदीला जातांनी परिवारातील सदस्याला सुची तयार करतांना हजर ठेवणे महत्वाचे आहे तरच भविश्यात बचतीच्या माध्यमातुन स्वतः चा विकास षक्य होईल.

हे आर्टीकल आपण वाचल्यानंतर पुर्ण महाराश्ट्रात जे व्यक्ती वाचतील त्यांचा पैसा फुल नाही फुलाची पाकळी समजुन बचत होईल महाराश्ट्रात प्रत्येक परिवाराचे १००० ते २००० रूपये बचत केल्यानंतरच लिहीन याला सुध्दा एक प्रकारचा आनंद होईल असे म्हणणे सर्वानुमते रास्त ठरावे. तरच खाया अर्थाने आपल्याला/सर्वांना खरेदीची सुंदरता बघावयास मिळेल. या समवेत आपल्या सगळयांना दिवाळीच्या आपल्या परिवाराला माझ्याकडून खुप खुप शुभेच्छा!

भविश्यात बचत, काटकसरच आपल्याला भरपुर आनंद देवुन स्वप्नपुर्ती करू शकते असे म्हणणे रास्त ठरावे.



विजय सरस्वती सिताराम सोनारघरे,
लेखक/वृत्तपत्र समिक्षक
स्नेहविजय २४, उदयनगर, गल्ली नं. ४,
नागपूर-४४००२४
मो.नं. ९३२५७३३८३६

# संशयाचे भूत !

वृत्तपत्रात एकाच दिवशी मन सुन्न करणाऱ्या दोन घटना वाचनात आल्या. एक घटना मुंबईतील काळाचौकी परिसरात घडलेली. सकाळी साडेनऊच्या सुमारास एका तरुणाने त्याचीच प्रेयसी असलेल्या तरुणीवर भररस्त्यात सपासप वार करून तिचा जीव घेण्याचा प्रयत्न केला आणि नंतर तोच सुरा स्वतःच्या गळ्यावर फिरवून स्वतःही आत्महत्या केली, तर दुसऱ्या एका घटनेत पिंपरी चिंचवड शहरातील एका सामाजिक कार्यकर्त्याची त्याच्याच पत्नीने कापडाने गळा आवळून हत्या केली. या दोन्ही घटना समाजमनाला हादरवणाऱ्या होत्या. दोन्ही घटनेत हत्या झालेली व्यक्ती आणि हत्या करणारे दोघेही एकमेकांच्या अत्यंत जवळचे होते. मुंबईतील घटनेत जीव गेलेले प्रेमी युगुल होते ज्यांचा नुकताच 'ब्रेकअप' झाला होता, तर पिंपरी चिंचवडमधील दोघे एकमेकांचे पती-पत्नी होते. एकमेकांवर कधीकाळी जिवापाड प्रेम करणारे, एकमेकांसोबत आयुष्य काढण्याच्या आणाभाका घेणारे आणि सुखी संसाराची स्वप्ने पाहणारी ही जोडपी यांच्यामध्ये नक्की काय बिनसले ज्यामुळे त्यांच्यातील संतापाने इतके उग्र स्वरूप धारण केले ज्यामधून जोडीदाराचा जीव घेण्याइतपत टोकाचे पाऊल उचलले गेले. अर्थात दोन्ही घटनांमध्ये एक सामायिक बाब होती ती म्हणजे 'संशय'. मुंबईतील मनीषा यादव आणि सोनू बरई दोघांचे एकमेकांवर खूप प्रेम होते; मात्र काही दिवसांपासून मनीषा इंस्टाग्रामवर दुसऱ्या एका तरुणाला 'फॉलो' करू लागल्याने मनीषा आणि सोनू यांच्यात वाद होऊ लागले. आठवडाभराच्या वादानंतर दोघांनी 'ब्रेकअप' केले; मात्र त्यानंतरही मनात राग ठेवून सूडाच्या भावनेने पेटून उठलेल्या सोनुने मनीषावर जीवघेणा हल्ला केला. सोनूच्या मनात संशयाचे विष चढल्याने त्याने हा टोकाचा निर्णय घेतला. पिंपरी चिंचवड येथील घटनेत सुद्धा 'संशय' हाच या घटनेमागील मुख्य सूत्रधार होता. परिसरात सामाजिक कार्यकर्ता म्हणून ख्याती असलेल्या आनंद भोईरला पत्नी चैत्रालीच्या चारित्र्यावर संशय येऊ लागला ज्यामुळे पती पत्नीमध्ये वाद होऊ लागले. घटनेच्या दिवशीही पहाटे अडीच - पावणेतीनच्या सुमारास दोघांमध्ये कडाक्याचे भांडण झाले ज्यामध्ये रागाच्या भरात चैत्राली हिने आनंद याच्या गळ्याभोवती कापड आवळून त्याची हत्या केली. दोन्ही घटनांमध्ये जोडीदाराच्या चारित्र्यावर संशय आल्याने वाद निर्माण झाले आणि वादाचे पर्यवसान खून करण्यापर्यंत झाले. दोन्ही घटनांत निर्माण झालेले संशय किती खरे आणि किती खोटे याचा शोध पोलीस घेतीलच. मात्र केवळ संशयाने तिघांचे नाहक जीव मात्र गेले. प्रेमी युगुल असो वा पती-पत्नी यांतील नाते टिकवायचे असेल आणि ते बहरायचे असेल, तर प्रेमासोबत एकमेकांवर दृढ विश्वास असणे नितांत गरजेचे आहे कारण खरे नाते हे विश्वासावरच टिकते आणि फुलते. एकदा विश्वासाला तडा गेला कि नात्यामध्ये दरी निर्माण व्हायला वेळ लागत नाही आणि ही दरी निर्माण करण्याचे काम करतो तो 'संशय' ! नात्याची वीण जर घट्ट असेल आणि जोडीदाराशी सुसंवाद असेल तर तिथे संशयालाही जागा उरत नाही. संशयाने प्रवेश करण्याचा प्रयत्न केलाच तर सुसंवादाने त्याचे निरसनही वेळीच होते. मात्र अशावेळी दोघांनी डोके शांत ठेवून सामंजस्याने वागणेही महत्वाचे ठरते. विज्ञानाने केलेल्या प्रगतीमुळे बदललेले राहणीमान, प्रत्येकाच्या हातात आलेले 'स्मार्ट फोन्स', त्यावर मिळणारा 'अनलिमिटेड डाटा', सर्वांसाठी फुकटात खुली असलेली सामाजिक माध्यमे, त्यातून निर्माण होणाऱ्या ओळखी आणि ओळखींमधून वाढत जाणारा संवाद कुठेतरी रक्ताच्या नातेवाईकांपासून, जीवास जीव देणाऱ्या मित्रपरिवारापासून दूर नेणारा ठरू लागला आहे. एका निरीक्षणानुसार आजमितीला होणाऱ्या प्रत्येक ३ घटस्फोटांपैकी एक घटस्फोट सामाजिक माध्यमांमुळे होतो. आता तर त्याही पुढे जाऊन खूनसुद्धा होऊ लागले आहेत. नात्यांतील गोडवा टिकण्यासाठी सामाजिक माध्यमांच्या वापरावर स्वतःहून निर्बंध घालणे आज गरजेचे बनले आहे !



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई
मो.क्र. ९६६४५५९७८०

# वाघाच्या हल्ल्यात आणखी एका शेतकऱ्याचा मृत्यू
# चंद्रपूर जिल्ह्यात मानवबन्यजीव संघर्ष तीव्र

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ : चंद्रपूर जिल्ह्यातील मानव-वन्यजीव संघर्ष वाढीस लागला आहे. नागभिड तालुक्यातील आकापूर येथील वासुदेव वेटे हा शेतकरी वाघाच्या हल्ल्यात ठार झाला. शेतात काम करायला गेला असता वाघाने त्याच्यावर हल्ला केला.जिल्ह्यात मानव-वन्यजीव संघर्ष सर्वाधिक तीव्र असल्याचे समोर आले आहे. मागील पाच वर्षांत जिल्ह्यात १७५ नागरिकांचा वाघ व इतर वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत्यू झाला. २०२५ मधील अवघ्या सहा महिन्यांत २५ ग्रामस्थांचा बळी गेला. वाघांची



वाढती संख्या लक्षात घेता भविष्यात हा संघर्ष आणखी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे यावर वेळीच उपाययोजना करण्याची गरज आता सर्वच स्तरातून व्यक्त होवू लागली आहे. जंगलाचे क्षेत्र कमी होत चालल्याने वाघ आता गावाच्या दिशेने कूच करीत आहे. शेतीची कामे, मोहफूल व तेंदूपाने गोळा करणे, सरपण तसेच गुरे चारणे, अशा विविध कामांसाठी गावकरी जंगलात किंवा जंगलाला लागून असलेल्या शेतशिवारात जातात. तिथे त्यांचा वाघाशी सामना होतो. यात ग्रामस्थांचा नाहक बळी जातो. ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील वाघ, बिबट यांच्या संख्येत दिवसागणिक वाढ होत आहे. मागील काही वर्षांत जंगल क्षेत्रातही वाढ झालेली आहे.

यामुळे मानव-वन्यजीव संघर्ष वाढत चालला आहे. नागभिड तालुक्यात घडलेल्या या घटनेनंतर वाघांचा बंदोबस्त करण्यासाठी आकापूर येथील गावकऱ्यांनी वनविभागाकडे वाघाचा बंदोबस्त करण्याची मागणी केली. पिंजरे लावून वाघाला जेरबंद करण्यात यावे. शेती व जंगलाच्या सभोवताल ताराचे कुंपण तयार करुन देण्यात यावे. तळोधी ते आकापूर, बाळापूर ते आकापूर व देवपायली ते बाळापूर रोडच्या दोन्ही बाजूला झाडेझुडपे साफ करुन देण्यात यावी.

रानडुकर, चितळ, निलगायीमुळे झालेले शेतीपिकाचे नुकसान त्वरीत पंचनामे करण्यात यावे, आदी मागण्या गावकऱ्यांनी वनखात्याकडे केल्या. यावर त्वरित या मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी गावकऱ्यांना दिले. दरम्यान, मृताच्या कुटूंबियांना वनखात्याकडून नुकसानभरपाई देण्यात आली.

## शिवराम मंदिरात कार्तिक मास उत्सव

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा , दि. २६ : वानाडोंगरी येथील प्रभाग क्रमांक ८ मधील रचना अपार्टमेंटजवळ राम आणि शिव मंदिरात सध्या पहाटेपासूनच काकड आरती,भजन आणि कीर्तनाचा आस्वाद नागरिकांना घेता येत आहे. श्री.संत गाडगे महाराजांच्या पोशाखासह आलेल भजन मंडळींनी मंदिर परिसरात ग्रामस्वच्छता अभियान राबविले. तसेच श्री.संत गाडगे महाराजांनी सांगितलेल्या विचारांचा अवलंब करा,आपला परिसर,आपले घर,आपले गाव आणि आपले नगर स्वच्छ ठेवा,कचरा हा नेहमी कचरा पेटीतच टाका,झाडे लावा आणि झाडांचे संवर्धन करण्याचा संदेश दिला जात आहे. या कार्यक्रमात श्रीकृष्ण धरमठोक,गजानन तांदुळकर,प्रतिका



तांदुळकर,खेमराज राणे,केशव वराटे, पुरुषोत्तम बरवड, ईश्वर पातरकाडे, राजू सपाटे, प्रमोद लालसरे, महादेव पारसे,जीवन पाध्ये, प्रकाश खोले, सुरेश शर्मा, राजेश जोशी, राजेंद्र सांभारे, महेंद्र पांडे, सुदेश मर्चंडे, श्री.दंडाले, हिरामण राखोडे,विष्णू राऊत, वेगष ठाकरे, राजेंद्र जोशी यांचा प्रमुख सहभाग आहे. वासुदेव डाखळे. प्रभाबाई तादूळकर.

## कुटुंब दर्शनाला, चोरटा घरात

**नागपूर:** कुटुंब दर्शनासाठी शिर्डीला गेल्याची संधी साधत अज्ञात आरोपीने घरफोडी करून १ लाख ३५ हजार रुपयांच्या मालावर डल्ला मारला. ही घटना तहसील पोलिस ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी वंदना प्रभाकर महाजन (५०) रा. बंगाली पंजा, पिवळी मार्बत चौकच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. वंदना यांच्या घराशेजारीच राहणारा त्यांचा पुतण्या पुरूषोत्तम महाजन गुरूवारी सायंकाळी ७.३० वाजताच्या सुमारास घराला कुलूप लावून कुटुंबासह साई बाबांचे दर्शनासाठी शिर्डीला गेला होता. या दरम्यान अज्ञात आरोपीने मुख्य दाराचे कुलूप व कडीकोंडा तोडून पुरूषोत्तमच्या घरात प्रवेश केला. घरातील रोख ३५ हजार आणि सोन्याचांदीचे दागिने असा १.३५ लाख रुपयांचा मुद्देमाल चोरी करून पसार झाला. शनिवारी सकाळी वंदना यांना पुरूषोत्तमच्या घराचे कुलूप तुटलेले दिसले. त्यांनी घटनेची माहिती पुतण्यासह पोलिसांना दिली. तहसील पोलिस घटनास्थळी पोहोचले. प्राथमिक तपासानंतर अज्ञात आरोपीवर गुन्ह्याची नोंद करून तपास सुरू केला आहे.

## ५५० वाहन चालकांवर कारवाई

**नागपूर.** वाहतूक शाखा पोलिसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण ५५० वाहन चालकांवर कारवाई करून १,५८,१०० रुपयांचा दंड वसूल केला. त्याचप्रमाणे शहर पोलिसांनी महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये ५ प्रकरणात ६ आरोपींवर कारवाई करून १०,२२० रुपयांचा माल जप्त केला. तसेच महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये १ प्रकरणात ५ आरोपींवर कारवाई करून ४,११,७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

## बंगाली पंजा येथे १.३५ लाखांची चोरी

**नागपूर, दि. २६:** पिवळी मारबत चौक, बंगाली पंजा येथे राहणाऱ्या पुरुषोत्तम महाजन यांच्याकडे घरफोडी करून अज्ञात चोरांनी १ लाख ३५ हजाराचा ऐवज चोरून नेला. २३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७.३० च्या सुमारास महाजन यांनी आपले घर कुलूपबंद केले आणि कुटुंबियासह ते शिर्डी येथे दर्शनासाठी गेले होते. ही संधी साधून अज्ञात चोरांनी दाराचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला आणि सोन्याचांदीचे दागिने व रोख ३५ हजार रुपये असा १ लाख ३५ हजाराचा ऐवज चोरून नेला. याप्रकरणी तहसील पोलिसांनी घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे.

## गावठी दारूची तस्करी करणाऱ्यास अटक

**नागपूर, दि. २६:** दुचाकी गावठी दारूची तस्करी करणाऱ्या सुनील लक्ष्मण मोहतुरे (३८) होळी चौक, सावनेर यास मुद्देमालासह पोलिसांनी अटक केली.

सुनील हा दारूची तस्करी करणार आहे अशी माहिती सावनेर पोलिसांना मिळाली होती. पोलिसांनी दुर्गादेवी चौक, चिचपुरा येथे नाकाबंदी लावली. सुनील घटनास्थळी येताच पोलिसांनी त्याला पकडले. त्याच्याजवळ २० लीटर गावठी दारू मिळून आली. पोलिसांनी दुचाकीसह ५२ हजाराचा मुद्देमाल जप्त केला.

## ट्रॅक्टर उभा करण्यावरून झालेल्या वादात चौघांना मारहाण

**नागपूर, दि. २६ :** घरासमोर ट्रॅक्टर उभा करण्यावरून झालेल्या वादावादीत एकाच कुटुंबातील चौघांना मारहाण केली असून त्यात दोघांची प्रकृती असल्याची घटना आपतूर (ता. उमरेड) येथे घडली. याप्रकरणी पोलिसांनी चौघांना अटक केली. जखमी आणि आरोपी हे शेजारी शेजारी राहतात. आरोपी मंगेश ईश्वर देशमुख हा जयश्री जयराम देशमुख यांच्या घरासमोर आपला ट्रॅक्टर उभा करीत असे. त्यामुळे जयश्री देशमुख कुटुंबियांना त्रास होत होता. घरासमोर ट्रॅक्टर उभा केल्याने जयश्री यांच्या सासूने मंगेशला हटकले होते. त्यावरून मंगेशने जयश्री यांच्या सासूला मारहाण केली होती. जयश्रीचे पती जयराम देशमुख यांनी माझ्या आईला मारहाण का केली? अशी मंगेशला विचारणा केली. त्यावरून त्यांच्यात वाद झाला. या वादावादीत मंगेश देशमुख (४५), भूषण मंगेश देशमुख (२१), आदित्य मंगेश देशमुख (१९), ईश्वर महादेव देशमुख (७७) आणि महिलांनी जयश्री व त्यांच्या कुटुंबियांसोबत भांडण करून हातबुक्क्यांनी मारहाण केली. त्याचप्रमाणे भूषणने जयरामला लोखंडी छन्नीने मारून त्यांचा जिव घेण्याचा प्रयत्न केला. जयराम यांच्या मुलाने मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला असता त्यालाही काठीने जबर मारहाण करण्यात आली. जखमींना मेडिकलमध्ये भरती करण्यात आले.

याप्रकरणी उमरेड पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून भूषण, आदित्य, मंगेश आणि ईश्वर यांना अटक केली.

## रिलायन्स स्मार्ट मॉलच्या अधिकाऱ्यांवर गुन्हा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ : अनधिकृत बांधकाम करून पार्किंगमध्ये ज्वलनशील जिवनावश्यक वस्तू ठेवल्याने शेजारच्या इमारतीला आग लागून ५० ते ६० लाखांचे नुकसान झाल्याप्रकरणी बजाजनगर पोलिसांनी रिलायन्स स्मार्ट मॉलच्या मालकावर गुन्हा दाखल केला आहे.

लक्ष्मीनगरातील आठ रस्ता चौकात असलेल्या योगीराज सुयोग पॅलेस येथील रिलायन्स स्मार्ट मॉल आहे. पॅलेसच्या मोकळ्या जागेत कंपनीच्या वतीने अनधिकृत बांधकाम करून पार्किंगमधील तळमजल्यातील गोदामात टॉयलेट क्लिनर, गोडे तेलाचे डबे ठेवले होते. याप्रकरणी मॉलच्या शेजारी राहणाऱ्या अनिल द्वारकादास गांधी (६८) यांनी अनेकदा मॉलच्या अधिकाऱ्यांना आणि जागेच्या मालकाला अनेकदा तोंडी आणि लेखी स्वरुपात मॉलचे अतिक्रमण हटविण्याची विनंती केली होती. परंतु, याकडे कुणीही लक्ष दिले नव्हते. २१ ऑक्टोबरला दिवाळीच्या दिवशी फटाक्यामुळे पार्किंगमध्ये ठेवलेल्या सामानाने पेट घेतला. त्यामुळे मॉलला आणि त्याच्या शेजारी राहणाऱ्या गांधी यांच्या इमारतीला देखील आग लागली.

या आगीत गांधी यांच्या अपार्टमेंटमधील लोकांचे इलेक्ट्रीक वायरिंग, वॉशिंग मशीन, इलेक्ट्रीक साहित्य, वातानुकुलित यंत्र आदी मौल्यवान वस्तू जळून खाक झाल्या. या जाळपोळीत गांधी यांच्या अपार्टमेंटमधील ५० ते ६० लाखांचे नुकसान झाले. याप्रकरणी मॉलच्या अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी गांधी यांनी केली होती. बजाजनगर पोलिसांनी केलेल्या तपासात आग लागल्यास मोठी जिवितहानी व मालमत्तेचे नुकसान होऊ शकते हे माहित असून देखील मॉलच्या अधिकाऱ्यांनी काहीच उपाययोजना केल्या नाहीत. त्याचप्रमाणे २०२१ नंतर कुठल्याही प्रकाराचे फायर ऑडीट करून घेतले नाही. अग्नी प्रतिरोधक उपाययोजना न करता दुर्लक्ष केले. या बाबी समोर आल्याने शेवटी बजाजनगर पोलिसांनी मॉलच्या अधिकाऱ्यांवर विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

## विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ व वाणिज्य शिक्षक मंडळ, नागपूर

### नागपूर ग्रामीण वर्धा जिल्हा कार्यकारिणी गठितीसाठी संयुक्त ऑनलाईन बैठक संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ : विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ व वाणिज्य शिक्षक मंडळ, नागपूर यांनी नागपूर ग्रामीण आणि वर्धा जिल्हा कार्यकारिणी गठित करण्यासाठी संयुक्त ऑनलाईन बैठक आयोजित केली. बैठकीत शिक्षक संघटनात्मक बळकटी, रौप्यमहोत्सवी द्वैवार्षिक अधिवेशनाची तयारी आणि शिक्षकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत अद्ययावत ज्ञान पोहोचविण्याचे नियोजन यावर सखोल चर्चा झाली. मंडळ मागील २५ वर्षांपासून शिक्षक व विद्यार्थीहितासाठी सातत्याने कार्यरत असून, विविध चर्चासत्रे, प्रशिक्षण वर्ग आणि शैक्षणिक कार्यक्रमांच्या माध्यमातून ज्ञानजागृती निर्माण केली आहे. यावर्षी मंडळाचे रौप्यमहोत्सवी वर्ष असून, १९ व २० डिसेंबर २०२५ रोजी नागपूर येथे भव्य अधिवेशन आयोजित केले जात आहे. बैठकीचे अध्यक्ष डॉ. अशोक गव्हाणकर होते, तर सचिव डॉ. चेतन हिंगणेकर यांनी मीटिंगचा उद्देश स्पष्ट केला व अधिवेशनाच्या तयारीबाबत मार्गदर्शन केले. आयोजक डॉ. अभिजीत देशमुख यांनी बैठक यशस्वी रित्या पार पाडली. बैठकीस नागपूर ग्रामीण व वर्धा जिल्ह्यातील शिक्षक-शिक्षिक प्रा. डॉ. अनीस बेग, प्रा. अभिजीत डाखोरे, प्रा. अनंता बुर्हाण, प्रा. सतीश गजबांधे, प्रा. दीपक डांभाळे, प्रा. खुशबू कटुलवार, प्रा. मयूर गांधी, प्रा. नीलम बरमासे, प्रा. नितीन कोल्हारकर, प्रा. शीतल देशमुख, प्रा. श्रद्धा चांडक, प्रा. स्नेहा गेडाम, प्रा. सुनील अळेवार, प्रा. विष्णू फुले प्रा. चंद्रकांत एसनसुरे, प्रा. यशश्री जाधव आणि प्रा. आशा मॅडम व मोठ्या संख्येने शिक्षक बंधू भगिनी उपस्थित होते. सर्व उपस्थित शिक्षकांनी रौप्यमहोत्सवी अधिवेशन अधिक प्रभावी, उपयुक्त आणि विद्यार्थीहितदायी करण्याचा निर्धार व्यक्त केला.

## निधन वार्ता

**अलका पाठक**



के २२, भरतनगर निवासी अलका हेमंत पाठक यांचे आजाराने निधन झाले. त्या ६८ वर्षाच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, २ मुले व मोठा आप्तपरिवार आहे. अंबाझरी घाटावर अंत्यसंस्कार पार पडला.

**शशिकला बनोदे**

शारदा माता मंदिर जवळ, जुनी शुक्रवारी निवासी शशिकला बलभद्र बनोदे यांचे शनिवारी निधन झाले. त्या ७८ वर्षाच्या होत्या. गंगाबाई घाटावर अंत्यसंस्कार पार पडला.

**वंदना चकोले**



बासोरा (जि. भंडारा) निवासी वंदना केशव चकोले यांच अल्प आजाराने निधन झाले. प्रसन्ना चकोले यांच्या त्या काकू होत. त्यांच्या पश्चात बराच मोठा आप्तपरिवार आहे. मोक्षधाम भंडारा येथे अंत्यसंस्कार पार पडला.

## दहावी-बारावीच्यपरीक्षा शुल्कात वाढ

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने आर्थिक ताण आणि वाढत्या प्रशासकीय खर्चाचा हवाला देत दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात वाढ जाहीर केली आहे.

या शैक्षणिक वर्षापासून दहावीच्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क १०० रुपयांनी वाढवून ४२० रुपये करण्यात आले असून, बारावीच्या विद्यार्थ्यांचे शुल्क १७० रुपयांनी वाढून ४७० रुपये करण्यात आले आहे. अलीकडच्या तीन वर्षांत ही मंडळाकडून करण्यात आलेली तिसरी शुल्कवाढ आहे. या निर्णयामुळे राज्यभरातील लाखो विद्यार्थी आणि त्यांचे पालक चिंतेत पडले आहेत. नागपूर जिल्ह्यातच दरवर्षी सुमारे ६० ते ७० हजार विद्यार्थी दहावीची, तर ४० ते ४५ हजार विद्यार्थी बारावीची परीक्षा देतात. या विद्यार्थ्यांच्या पालकांनी या वाढीचा निषेध व्यक्त केला असून, शासनाने तत्काळ हस्तक्षेप करून निर्णय मागे घ्यावा, अशी मागणी केली आहे. मंडळाने या वाढीचे समर्थन करताना सांगितले की, प्रश्नपत्रिका छपाई, उत्तरपत्रिका, परीक्षा केंद्रांचे व्यवस्थापन, पर्यवेक्षक व शिक्षकांचे मानधन, तसेच डिजिटल मूल्यमापन प्रक्रियेवरील वाढता खर्च यामुळे शुल्कवाढ अपरिहार्य झाली आहे. परंतु पालक संघटना आणि शिक्षक संघटनांनी या कारणांना दुबळे ठरवत मंडळावर टीका केली आहे. महागाईच्या काळात सामान्य कुटुंब आधीच अडचणीत आहे. शिक्षण क्षेत्र हे सामाजिक जबाबदारीचे क्षेत्र असून, अशा काळात विद्यार्थ्यांवर आर्थिक भार टाकणे अमानवी आहे, असे मत पालक संघटनेच्या प्रतिनिधी मंदार पाटील यांनी व्यक्त केले. दरम्यान, शिक्षक संघटनांनीही विद्यार्थ्यांच्या बाजूने भूमिका घेतली आहे. परीक्षा शुल्कात वाढ करण्याऐवजी शासनाने मंडळाला आवश्यक निधी पुरवावा.

शिक्षण हे सर्वांसाठी सुलभ राहा-वे, हीच खरी सामाजिक जबाबदारी आहे, असे माध्यमिक शिक्षक संघाचे प्रदेशाध्यक्ष अशोक देशमुख यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांमध्येही या निर्णयाबद्दल नाराजी व्यक्त होत आहे. सरकारी शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना एवढे शुल्क भरणे कठीण आहे. अनेक मित्रांनी आता कोचिंग फी आणि परीक्षा फी यामुळे आर्थिक अडचणी सांगितल्या आहेत, असे एका बारावीच्या विद्यार्थ्याने सांगितले.

दरम्यान, विविध विद्यार्थी संघटनांनी राज्यभरात या शुल्कवाढीच्या विरोधात आंदोलनाचा इशारा दिला आहे. त्यांनी मुख्यमंत्री व शिक्षणमंत्र्यांना निवेदन सादर करून निर्णयाचा पुनर्विचार करण्याची मागणी केली आहे.

शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत आहे की, मंडळाने आर्थिक शिस्तीबाबत पारदर्शकता ठेवावी आणि विद्यार्थ्यांवर अतिरिक्त भार न टाकता पर्यायी निधीव्यवस्था शोधावी. शुल्कवाढीवरून सुरू झालेला वाद आता राज्यव्यापी चर्चेचा विषय ठरला आहे.

## कुस्तीतूनच साहसी युवक घडतात : महसूलमंत्री बावनकुळे

■ महासागर प्रतिनिधी
मौदा , दि. २६ : आयुष्यात धाडसी गुण प्रत्येकात असावा. धाडस केल्याशिवाय यश मिळत नसते. बहुतांश मंडळींजवळ चांगले गुण असले तरी समोर जाण्याचे धाडसच नसते. परिणामी ते सर्व गुण असतानाही मागे पडतात. हा प्रकार टाळायचा असेल तर आपल्याला धाडसी युवक घडवावे लागतील. हा सर्व प्रकार घडविण्यासाठी कुस्ती खेळावी लागेल. कुस्ती खेळल्याने खेळणाऱ्याच्या मनात धाडस निर्माण होते अनब तो यश मिळवण्यासाठी पुढे जातो. अर्थात कुस्तीतूनच साहसी युवक घडत असतात असे प्रतिपादन राज्याचे महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

तालुक्यातील धानला येथे दिवाळीच्या शुभपर्वावर भाऊबीज निमित्त मंडई उत्सवाचे आयोजन गुरूवारला करण्यात आले होते. यानिमित्त कुस्तीची दंगल, तमाशा, गोंधळ, लावणी हे कार्यक्रम पार पडले. या उत्सवात गावात जणू यात्राच भरल्याचे चित्र होते. धाणल्याची मुंडई पाहून लोककलावंत भारावून गेल्याचे चित्र यावेळी दिसून आले. गुरुवारला कुस्त्यांची दंगल आयोजित करण्यात आल्याने तालुक्यातील व बाहेर जिल्ह्यातील तरुण मुलांनी व मुलींनी त्या दंगलीत सहभाग घेतला. मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देण्यात आले.

यावेळी माजी आमदार टेकचंद सावरकर, सरपंच ज्योती सावरकर, उपसरपंच अजय हारोडे, मंगेश ठोंबरे, मनीराम यादव, मोरेश्वर सोरते, खुशाल तांबडे, संदीप पत्रे, नारायण मेश्राम, राजू सोमनाथे, सूर्यकांत रोडे, भूषण सावरकर, रामेश्वर लिचडे, विनोद मदनकर, टिळक दंडारे, शरद भोयर, रवी चव्हाण, संकेत झाडे, बबलू पत्रे, सुधाकर धांडे, जीवन पत्रे, बाळकृष्ण राजगिरे, भगवंता पत्रे, , मंगेश बरबैय्या, मोनीष मेश्राम, रामदास वंजारी, कुंता बावणे, यशोधरा वाकडे. मंजू बावणे, संगीता तिरपुडे , मयुरी पत्रे, निरंजना पत्रे, सुरेश हारोडे, मनोहर मते, वामन मूंदेकर, सुरेंद्र पत्रे, बालू ठोंबरे, जितेंद्र डांगरे आदी उपस्थित होते.

शुक्रवार २४ ऑक्टोबर रोजी शाहीर माणिक यांचा राष्ट्रीय खडा तमाशाचे आयोजन करण्यात आले होते, गावात दिवाळीच्या अनुषंगाने आलेल्या पाहुणे मंडळीनी याचा चांगलाच आनंद लुटला. ग्रामीण भागातील लोककला जिवंत ठेवण्यासाठी मंडई उत्सवाचे आयोजन केले जाते. गावात घरोघरी पाहुण्यांची गर्दी दिसून येते. या निमित्ताने गावात नवीन जावई मुली येत असल्याने दिवाळीचे औचित्य साधत त्यांना मेजवानी दिली जाते.

### शेतकऱ्यांचा एक दिवस आनंदासाठी..!!!

वर्षभर राबणारा शेतकरी आपल्या कष्टाचा घाम मातीत गाळत असतो. एक दिवस शारीरिक विश्रांती व मानसिक उत्साह मिळावा यासाठी आनंद देणारी मंडईचा सण गावोगावी साजरे केले जातात. तसेच नवीन नातेसंबंध जोडण्यासाठी आयोजनाची सुरुवात असते. मंडईच्या दिवशी मुला-मुलींचेम्न जोडण्याचे कार्य मोठ्या प्रमाणात होत असतात.

### जत्रा आणि पाहुणे...!!!

मंडईला गावात जत्राच असते. कामानिमित्त गावाबाहेर असणाऱ्या कुटुंबीयांना घरी परत येण्यासाठी हक्काचा हा सण असतो. तसेच सासरी असलेल्या मुलीसुद्धा माहेरी येतात. प्रत्येक घरी नातेवाइकांचा आनंद मेळाच असतो. मंडईचा उत्साह, आनंद घेण्यासाठी कष्टाला एक दिवस सुट्टीच असते.

## इतवारीत श्री काली पूजा महोत्सवाचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ : निकालास मंदिर रोड इतवारी नागपूर येथील दरवर्षीप्रमाणे, १९८२ पासून श्री काली पूजा महोत्सवाचे आयोजन सातत्याने केले जात आहे. कार्तिक शुद्ध पंचमीला रविवार, २६ ऑक्टोबर रोजी रात्री १० वाजता होम हवन पूजा आणि कार्तिक शुद्ध षष्ठी रोजी मंगळवार, २८ ऑक्टोबरला दुपारी १ नंतर मूर्तीचे आगमन होईपर्यंत महाप्रसाद वितरण करण्यात आले . ३० ऑक्टोबर रोजी रात्री ९ नंतर विसर्जन मिरवणुकीची व्यवस्था केली जाईल. त्यानंतर पान सुपारी आरती आणि कार्तिक शुद्ध दशमीला शुक्रवार, ३१ ऑक्टोबर रोजी रात्री ८ नंतर कार्यक्रमाचे स्वरूप श्री सार्वजनिक काली माता उत्सव मंडळाने दिले आहे. मंडळाचे अध्यक्ष वासुदेव सामंत, उपाध्यक्ष विजय दुबे, चंचल अस्सल कार्याध्यक्ष, नारायणराव गोस्वामी विश्वनाथ सामंत, सचिव किशोर ठाकरे, अनुप सामंत, तरुण नायक सहसचिव, शिशिर सामंत, प्रशांत सामंत, नित्यालाल समुई कार्यवाहक, सचिव विकास सामंत, गौतम राऊतराजे व इतर सहसचिव पो.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समिती भंडारा समिती सल्लागार समिती गणसदस्य महोत्सवाचे योगदान देणारे उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी प्रवीण शर्मा यांनी भेट दिली आणि त्यांच्याच माध्यमातून वरील माहिती प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.



## पांडे लेआऊटमध्ये 'दीपसंध्या'ने रंगवली संगीतमय संध्याकाळ



**नागपूर :** पांडे लेआऊट येथे आयोजित सांस्कृतिक गणेश उत्सवात संगीत आणि कलांचा मनमोहक संगम पाहायला मिळाला. या उत्सवाच्या निमित्ताने निरंजन बोबडे यांच्या संकल्पनेतून दीपसंध्या हा मराठी व हिंदी गीतांचा बहारदार कार्यक्रम सादर करण्यात आला. संध्याकाळी रंगलेल्या या संगीतमय मैफलीने उपस्थित प्रेक्षकांना रसिकतेचा अविस्मरणीय अनुभव दिला. कार्यक्रमात प्रख्यात गायिका पल्लवी गुप्ते यांनी त्यांच्या सुरेल आवाजात एकापाठोपाठ एक गाणी सादर केली. त्यांच्या सादरीकरणावर उपस्थित श्रोत्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात उत्स्फूर्त दाद दिली. संध्येचे निवेदन धनश्री शेवलकर यांनी प्रभावीपणे केले, तर साऊंड सिस्टीमची जबाबदारी अभिषेक लियभोरे यांनी उत्तमरीत्या पार पाडली. झरपवशू ङ्रॉीं कार्यक्रमात गौरी शिंदे व पल्लवी मुकटे या सहकलाकारांनी 'निगाहे मिलिये', 'दिल चाहता है', 'मनमंदिरा', 'तुम बिन कहीं लगता नाही' यांसारखी लोकप्रिय हिंदी गाणी तसेच भावगीत, भक्तिगीत, चित्रपट गीत आणि लोकगीतांची उत्कृष्ट मेजवानी सादर केली. कार्यक्रमाचा समारोप वीर सावरकरांच्या देशभक्तीपर गीताने झाला. त्यानंतर निरंजन बोबडे यांनी सादर केलेल्या भैरवी चुनरी लागी ने संध्याकाळी सुरेल शेवट झाला. पांडे लेआऊट परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सांस्कृतिक सोहळ्याचा आनंद घेतला. संपूर्ण कार्यक्रमात रसिकांची उपस्थिती, कलाकारांची कामगिरी आणि उत्सवाचे वातावरण यामुळे गणेशोत्सवाचा रंग अधिकच खुलला.

## सहयोग फाउंडेशन तर्फे शांतीनगरमध्ये वृक्षारोप



**नागपूर:** सहयोग फाउंडेशनने शांतीनगरमध्ये झाडे लावा झाडे जगवा पर्यावरण वाचवा प्रदूषण थांबवा या उद्देशाने सामाजिक संघटने तर्फे वृक्षारोप कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यामुळे तयार झालेल्या लोकांचा समूह समाजावर निश्चितच आपला ठसा उमटवतो. दृढनिश्चयाने एकजूट राहणे हा निश्चितच यशाचा मार्ग आहे. पर्यावरणाच्या रक्षणासाठी सामील व्हा, झाडे लावा आणि देश वाचवा असे आव्हान प्रदिप पौनिकर यांनी केले त्यावेळी उपस्थित किशन निमजे, विजय नंदनवार, हेमराज कुंभारे, अनिल संभे, आणि इतर सहयोग फाउंडेशन चे सदस्य उपस्थित होते.

## अभाविप सदस्यसंख्या ३० हजाराच्या पुढे

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ : राष्ट्रकार्यात सदैव योगदान देणाऱ्या व शैक्षणिक क्षेत्रात भरीव उपक्रम राबविणाऱ्या अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या सदस्यत्व नोंदणी अभियानाला नागपूर महानगरात भरभरून प्रतिसाद मिळाला. या सदस्यता अभियानाला १५ ऑगस्ट २०२५ रोजी सुरुवात झाली होती. अवघ्या दोन महिन्यांत अभाविपने ३० हजारांपेक्षा अधिक विद्यार्थी-विद्यार्थिनींची नोंदणी करून एक विक्रमच नोंदविला आहे, असे नागपूर महानगर मिडिया संयोजक ऋत्विक डोंगरवार यांनी सांगितले.

अभाविपतर्फे दरवर्षी सदस्यत्व मोहीम राबविण्यात येते. यंदाही ही मोहीम देशभरात राबविण्यात आली. नागपूर महानगरात देखील हे सदस्यता अभियान राबविण्यात आले. या मोहिमेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जवळपास १२० पेक्षा अधिक कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयात हे सदस्यता अभियान राबविण्यात आले. सांस्कृतिक राष्ट्रवाद, स्वावलंबन, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि शिक्षणाचे भारतीयीकरण या प्रमुख मुद्यांवर कार्यरत अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेतर्फे सातत्याने विविध उपक्रम राबविले जातात, असेही पदाधिका-यांनीसांगितले.

### 'SFD' च्या माध्यमातून पर्यावरणाचे संरक्षण

अभाविपच्या अनेक उपक्रमांपैकी SFD अर्थात विकासार्थ विद्यार्थी हा एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. याअंतर्गत पर्यावरण संरक्षणासाठी काम करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये नवोपक्रम, जनजागृती आणि पर्यावरणीय विकासाला प्रोत्साहन देण्याचे कार्य केले जाते. विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून 'SFD' विद्यार्थी-विद्यार्थिनींनापर्यावरण संरक्षणासाठी आवश्यक साधने आणि संधी उपलब्ध करून देते. डऋऊद्वारे आयोजित केलेल्या प्रमुख कार्यक्रमांपैकी एक म्हणजे राष्ट्रीय पर्यावरण युवा संसद. या पर्यावरण संसदेत देशभरातील विद्यार्थी पर्यावरणातील विविध समस्या आणि त्यावर उपाय योजना मांडतात. अशी माहिती नागपूर महानगर मीडिया संयोजक ऋत्विक डोंगरवार यांनी सांगितले.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **MOHAMMAD WASIM**. NOW MY NEW NAME IS **WASIM SADIQUE MOHAMMAD**.
**ADD** : PLOT NO.59 KPLBA SWAMI CO HO SOCIETY, GOREWADA GODHANI ROAD, MANKAPUR, NAGPUR 440030.

RNINO-20789/71 | Mahasagar Nagpur | Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Tekdi Road, Sitabuldi, Nagpur. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Main office phone numbers:** 7447735851/9922970023/7447735853.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक २०७८९/१९७१ | महासागर नागपूर | **मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, टेकडी रोड, सिताबर्डी, नागपूर, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**फोन : ७४४७७३५८५१, ७४४७७३५८५३**

# कॅलिडोस्कोप




## ११ कोटींची लॉटरी आणि दवाखान्यात भरती!

लॉटरी लागावी आणि रातोरात आयुष्य बदलावं, असं अनेकांचं स्वप्न असतं. आयुष्यात कधीतरी लॉटरी लागेल या आशेनं अनेकजण तिकिटं विकत घेतात. परंतु त्यातून क्वचितच एखाद्याचं नशीब फळफळतं. असंच काहीसं ब्रिटनमधील नॉरफोक इथं राहणाऱ्या अॅडम लोपेझबाबत घडलं. एका लॉटरीच्या तिकिटामुळे तो चर्चेत आला आहे.

अॅडम एक सर्वसामान्य ड्राइव्हर असून त्याने लॉटरीचं तिकिट जिंकलं. याचं बक्षिस होतं तब्बल १.३ दशलक्ष डॉलर्स म्हणजेच जवळपास ११ कोटी रुपये. त्यावेळी अॅडमच्या बँकखात्यात फक्त १७ डॉलर्स होते. परंतु एका लॉटरीमुळे आयुष्य पालटलं आणि तो क्षणार्धात करोडपती झाला. अचानक इतके पैसे मिळाल्यानंतर अॅडमला काय करावं हेच सुचत नव्हतं. आता मुक्तपणे जगायचं, कशाचीच पर्वा करायची नाही, असं त्यानं ठरवलं होतं. एका रात्रीत श्रीमंत झाल्यानंतर त्यानं ड्राइव्हरची नोकरी सोडली आणि त्यानंतर तो सलग तीन महिने पार्टी करत होता. 'मी न थांबता पार्टी करत होतो. आयुष्यात पहिल्यांदाच इतका मुक्त जगत होतो. परंतु पैशांच्या आहारी जाऊन मी चुकीच्या मार्गावर गेलो. इतके पैसे पाहून अगदी वेडापिसा झालो होतो. मी दिवसरात्र केवळ पार्टी करण्यात पैसे घालवत होतो', असं त्यानं सांगितलं. अशाप्रकारे जुलैमध्ये लॉटरी लागल्यानंतर त्याने तीन महिने सलग पार्ट्या केल्या. पण सप्टेंबरमध्ये त्याची तब्येत बिघडली. त्याला श्वास घेण्यास त्रास जाणवत होता आणि चालणंही कठीण झालं होतं.

अखेर रुग्णवाहिका बोलावून अॅडमला रुग्णालयात दाखल करण्यात आलं. स्ट्रेचरवर उचलून रुग्णवाहिकेत ठेवण्यात आलं, तेव्हा आयुष्यातील सर्वांत मोठा धक्का बसल्याचं त्यानं सांगितलं.

रुग्णालयात काही तपासण्या केल्यानंतर अॅडमच्या फुफ्फुसांमध्ये रक्ताच्या गुठळ्या असल्याचं निदान झालं होतं.

त्याच्यावर उपचार करण्यात आले. रुग्णालयात तो आठ दिवसांपेक्षा अधिक काळ होता. 'तिथले लोक देवदूतासारखे होते. त्यांनी मला जीवदान दिलं. माझ्यासाठी हा सर्वांत मोठा धडा होता. तुमच्याकडे दहा लाख असोत किंवा अब्जावधी रुपये असो... रुग्णवाहिकेत निपचित पडून असता तेव्हा कोणतेच पैसे महत्त्वाचे नसतात...' अशा शब्दांत तो व्यक्त झाला. अॅडम सध्या आरोग्यावर आणि पूर्णपणे बरं होण्यावर लक्ष केंद्रीत करत आहे. लवकरच पूर्णपणे बरं होण्याचं त्याचं ध्येय आहे. नोकरी सोडल्याचाही त्याला पश्चात्ताप झाला आहे.

## आता चालकविरहीत रिक्षा येणार

भारतात सध्या 'टेस्ला'ची चांगलीच चर्चा आहे. अशातच या कारला टक्कर देणारी ड्रायव्हरलेस ऑटो रिक्षा भारतात लाँच झाली आहे. 'ओमेगा सेकी मोबिलिटी' (ओएसएम) ने भारतीय बाजारपेठेत जगातील पहिली इलेक्ट्रिक थ्री-व्हीलर लाँच केली असून 'स्वयंगती' असे या वाहनाचे नाव आहे. या रिक्षाचे बुकिंगही सुरू झाले आहे. प्रवासी प्रकाराच्या या रिक्षाची किंमत अंदाजे चार लाख आहे तर लॉजिस्टिक्स/कार्गो आवृत्ती लवकरच लाँच केली जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे. याची किंमत अंदाजे चार लाख १५ हजार रुपये असेल. ही रिक्षा बॅटरीवर चालते आणि सिंगल चार्जमध्ये १२० किलोमीटरपर्यंतची रेंज देते. यात 'ओएसएम' चा इलेक्ट्रिक प्लॅटफॉर्म आणि 'एआय'आधारित ऑटोनॉमसी सिस्टम आहे.

'स्वयंगती'मध्ये रिडर, जीपीएस, एआय-आधारित अडथळा शोधणे (सहा मीटर पर्यंत), मल्टी-सेन्सर नेव्हिगेशन आणि रिमोट सेफ्टी कंट्रोल आदी समाविष्ट आहे.

या प्रणाली विमानतळ, तंत्रज्ञानयुक्त उद्याने, स्मार्ट कॅम्पस, औद्योगिक केंद्रे आणि गर्दीच्या भागात स्वायत्तपणे कार्य करण्यास वाहनांना सक्षम करतात. 'स्वयंगती'



भारतातील रहदारी आणि विविध भूप्रदेशांची स्थिती लक्षात घेऊन डिझाइन केली आहे. ती उच्चघनता, कमी-वेगवान रहदारी तसेच स्मार्ट शहरे, औद्योगिक क्षेत्रे आणि वाहतूक केंद्रांसाठी आदर्श आहे. पूर्णपणे इलेक्ट्रिक असल्याने त्यात शून्य टेलपाइप उत्सर्जन आणि कमी ऑपरेटिंग खर्च अंतर्भूत आहे.

या ऑटोची तीन किलोमीटरच्या स्वायत्त मार्गावर पहिल्या टप्प्यातील चाचणी आधीच पूर्ण झाली असून त्यामध्ये सात थांबे, रिअल-टाइम अडथळा शोधणे आणि मानवी हस्तक्षेपाशिवाय सुरक्षित प्रवासी हालचाल यांचा समावेश आहे. दुसऱ्या टप्प्यात नियंत्रित वातावरणात व्यावसायिक रोलआउट सुरू होईल. 'स्वयंगती' हे केवळ उत्पादन लाँचिंग नाही तर भारतीय वाहतुकीच्या भविष्यातील हे एक मोठे पाऊल आहे. स्वायत्त वाहने आता भविष्याची कल्पनारम्य राहिलेली नाहीत तर वर्तमानाची गरज आहेत. आम्ही दाखवून दिले आहे, की भारत जागतिक ट्रेंडचे अनुसरण करण्याऐवजी त्यांचे नेतृत्व करू शकतो,' असे कंपनीचे संस्थापक आणि अध्यक्ष उदय नारंग यांचे म्हणणे आहे.




## रेल्वे स्टेशनवर औषधाचे दुकान का नसते?

रेल्वे फक्त प्रवासाचं एक साधन नसून खऱ्या अर्थानं भारतामध्ये अनेकांची ती जीवनवाहिनी आहे. देशाच्या बहुतांश भागांमध्ये रेल्वेच्या जाळ्याचा विस्तार झाला असून दळणवळणाचं हे साधन विकासामध्ये मोलाचा हातभार लावत आहे.

भारतीय रेल्वेनं प्रवास करणं म्हणजे एक खास अनुभव आहे. राज्य, प्रांत बदलत पुढे जाणारा हा प्रवास फक्त नव्या स्थानकांवरच पोहोचवत नाही तर वेगळ्या संस्कृतीपर्यंत पोहोचण्यास सुद्धा मदत करतो. रेल्वे एखाद्या स्थानकावर थांबली असता सहज बाहेर डोकावलं की दुकानं दिसतात. कुठं अल्पोपहार मिळतो, कुठं फक्त पाणी मिळतं तर कुठे वाफाळता चहा विकला जातो. रेल्वे स्थानकांवर फळं आणि भेळसुद्धा मिळते. मात्र तुम्ही एक गोष्ट कधी विचारात घेतली का? रेल्वे स्थानकावर औषधांचं दुकान अर्थात मेडिकल स्टोअर मात्र कधीच नसतं. असं का?

औषधांची विक्री हे सोपं काम नाही. त्यासाठी काही कायदेशीर नियम आणि अटीशर्थींचं पालन करणं अपेक्षित असतं. शिवाय औषधं ठराविक तापमानात, सुरक्षित स्थळी ठेवणं अपेक्षित असतं. औषधे विक्रेत्यांच्या दुकानावर एक परवानाधारक फार्मासिस्ट असणं गरजेचं असतं. रेल्वे स्थानकासारख्या गर्दीच्या ठिकाणी या नियमांचं पालन सहसा होत नाही किंवा ते करणं आव्हानात्मक असतं. इथं बनावट औषधांची विक्री होण्याचा मोठा धोका असतो. शिवाय काही औषधांचा गैरवापर होणंही संभवतं. ज्यामुळे सहसा रेल्वे स्थानकांवर, फलाटांवर मेडिकल स्टोअर नसतात. आणखी एक कारण म्हणजे बाजारातील दरांपेक्षा रेल्वे स्थानकावर काही गोष्टींचे दर अधिक असतात. यामध्ये प्रवासभाडं आणि इतर गोष्टींची रक्कमही जोडली जाते. औषधांच्या बाबतीत कायदेशीररित्या तसं करणं गुन्ह्यास पात्र ठरतं. बहुतांश प्रवासी सवयीनुसार सोबत औषधांचा साठा बाळगतात. त्यामुळं बऱ्याचदा अशा मेडिकलना तोटा सोसावा लागतो. म्हणूनही रेल्वे स्थानकांवर मेडिकल नसतात.

अर्थात मेडिकल स्टोअर नसले तरीही रेल्वे स्थानकांवर फर्स्ट एड रुम मात्र असते. जिथं प्रशिक्षित वैद्यकिय कर्मचारी आणि डॉक्टर प्रवाशांच्या सेवेसाठी हजर असतात. आपात्कालिन परिस्थितीत इथं प्रवाशांना प्रथमोपचाराची सुविधा पुरवली जाते. परिस्थिती गंभीर असल्यास रुग्णाला उपचारासाठी नजीकच्या रुग्णालयातही पाठवण्याची व्यवस्था केली जाते.

## चॅटजीपीटीवरचा प्रश्न महागात, थेट तुरुंगात!



आता आपण कोणतीही छोटी-मोठी माहिती विचारण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर (एआय) अवलंबून राहतो. कोणत्याही प्रश्नाचे उत्तर हवे असेल वा समस्येवर उपाय हवा असेल तर आपण प्रश्न विचारतो आणि 'एआय' काही सेकंदात उत्तर देतो. परंतु या तंत्राच्या उपयोगाचे विधायक आणि विघातक असे दोन भाग असतात. असाच काहीसा प्रकार एका शालेय मुलाबाबत घडला आहे.


आपण स्मार्ट दिसण्यासाठी इंटरनेटवर सर्च करतो. काही जण गुन्हेगारीबद्दलची माहिती 'एआय'ला विचारतात. त्यांना काही तरी चमत्कारिक उत्तर मिळेल अशी आशा असते; परंतु अशा प्रकारे प्रश्न विचारणे कधी-कधी महागात पडू शकते. नुकतीच अशी घटना उघडकीस आली आहे. अमेरिकेतील फ्लोरिडा राज्यात राहणाऱ्या एका १३ वर्षांच्या मुलासोबत एक प्रसंग घडला. आता हा मुलगा चुकीची शिक्षा भोगत आहे. हा प्रकार डेलँड शहरातील 'साऊथ वेस्टर्न मिडल स्कूल' मधला आहे. येथील सातवीत शिकणाऱ्या या मुलाने वर्गात असतानाच चॅटजीपीटीवर एक प्रश्न टाईप केला आणि त्याला जन्माची अद्दल घडली.

या विद्यार्थ्याने चॅटजीपीटीवर 'मी माझ्या मित्राला कसे मारू शकतो? ' असा प्रश्न विचारला. स्वाभाविकच या प्रश्नामुळे शाळा प्रसाशन आणि पोलीस हादरले. या मुलाने असा प्रश्न विचारताच शाळेतील डिजिटल मॉनिटरिंग सिस्टम सक्रिय झाली. या सिस्टीमने ताबडतोब शाळा प्रशासन आणि पोलिसांना अलर्ट पाठवला. काही वेळातच शाळेत पोलीस दाखल झाले आणि त्यांनी तपास सुरू केला. मात्र चौकशीत या मुलाचा कोणालाही नुकसान पोहोचवयाचा हेतू नसल्याचे समोर आले. मुलाने सांगितले की, आपल्याला त्रास देणाऱ्या एका मित्राची गंमत करण्यासाठी आपण सहज हा प्रश्न विचारला आक्णि कोणते मजेशीर उत्तर येते, हे पाहण्याचा प्रयत्न केला. या उत्तरावरुन आपण मित्राला चिडवू असे त्याला वाटत होते. यासाठी हा उद्योग केल्याचे त्याने सांगितले.

मात्र पोलीस आणि शाळा प्रशासनाने यास गांभीर्याने घेतले. मुलगा मस्करी करत होता, तरी त्याचे असे वागणे संभाव्य धोक्याकडे इशारा करते. त्यामुळे यास हलक्यात घेता येत नाही, असे सांगण्यात आले. त्यामुळेच आता या मुलाला पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याची रवानगी बालसुधारगृहात केली आहे. या प्रकरणाची चौकशी सुरू आहे.

## घरकाम करणाऱ्या महिलेचा साठ लाखांचा फ्लॅट

कठोर परिश्रमाने मिळवलेल्या यशाच्या अनेक कथा तुम्ही ऐकल्या असतील. परंतु ही एक आश्चर्यचकित करायला लावणारी घटना आहे. घरकाम करणाऱ्या एका महिलेसंबंधीच्या या बातमीने 'सोशल मीडिया'वर सध्या खळबळ माजवली आहे. या बातमीने सर्वांना कर, बचत आणि आर्थिक नियोजन याबद्दल विचार करायला भाग पाडले आहे.



ही घटना गुजरातमधील सुरतमध्ये घडली. तिथे घरकाम करणाऱ्या एका महिलेने अलिकडेच ६० लाख रुपयांना आलिशान थ्री बीएचके फ्लॅट खरेदी केला. हा आश्चर्यकारक गौप्यस्फोट नलिनी उनगर नावाच्या एका माजी ट्विटर वापरकर्त्याने केला असून वर उल्लेख केलेली महिला त्यांच्याकडे मदतनीस म्हणून काम करणारी आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे ६० लाख रुपयांच्या फ्लॅटसाठी फक्त १० लाख रुपयांचे कर्ज घेतले आहे. शिवाय तिने फर्निचरवर चार लाख रुपये खर्च केले आहेत. याचा अर्थ असा की, या महिलेने बचत आणि रोख रकमेतून आपले स्वप्न साकारले आहे.

नलिनीने पोस्टमध्ये लिहिले, आश्चर्य तिथेच संपत नाही. ही काही तिची पहिली मालमत्ता नव्हती. वेलांजा गावात तिचे आधीच एक दुमजली घर आणि एक दुकान होते. हे दोन्ही भाड्याने दिले होते. बाईंच्या या बोलण्याने नलिनी थक्क झाली आणि क्षणभर नि:शब्द झाली. तिची पोस्ट वाऱ्यासारखी पसरली असून प्रत्येकजण आपापल्या पद्धतीने त्यावर कमेंट करत आहे. कमेंट सेक्शनमधील एक मोठा वर्ग याला 'कर न भरलेल्या पैशाची जादू' म्हणत आहे. एका वापरकर्त्याने म्हटले आहे की, पगारदार अर्धे उत्पन्न करांमध्ये गमावतात. घरकाम करणारे तसेच रस्त्यावरील विक्रेते कर भरत नाहीत, म्हणून ते इतरांपेक्षा लवकर संपत्ती जमा करतात. अनेक वापरकर्त्यांनी कररचना मध्यमवर्गाला खाऊन टाकत असल्याचे म्हणत नाराजी व्यक्त केली आहे. पण अनेकजण बाईंच्या मेहनतीचे कौतुक करत आहेत.

## हा आहे ००३




मेक्सिकोतल्या युक्तान प्रांतातल्या मेरिदा शहरात केसेरा पिझ्झा नामक पिझ्झा कंपनीने एका अनोख्या स्पर्धेचं आयोजन केलं होतं. या स्पर्धेत भन्नाट नावाच्या लोकांना मोफत पिझ्झा खायला मिळणार होता. या स्पर्धेत वेर्सिंगेटरोज, नीविया आणि बाहजिबादी या नावाचे लोक अंतिम फेरीत दाखल झाले. या तिघांपैकी एकाला विजेतेपद मिळेल, असं लोकांना वाटलं. तेव्हा तिथे एक मुलगा आला. त्याने आपलं नाव सेरो सेरो स्ट्रेस असल्याचं सांगितलं. स्पॅनिश भाषेत या शब्दाचा अर्थ '००३' असा होतो. या नावासमोर वेर्सिंगेटरोज, नीविया आणि बाहजिबादी ही नावं फिकी पडली आणि सेरोला विजेता ठरवण्यात आलं. मेक्सिकन लोक आपल्या मुलांची विचित्र नावं ठेवतात. पण सेरो सेरो स्ट्रेस हे नाव खूपच भन्नाट आहे. जेम्स बाँडच्या फॅनने आपल्या मुलाचं असं नाव ठेवलं असावं, असं अनेकांना वाटलं. तसंच हा मुलगा मस्करी करत असेल असंही अनेकांना वाटलं. या मुलाने मोठं झाल्यानंतर आपलं नाव बदललं असावं, असंही अनेकांना वाटून गेलं. पण प्रत्यक्षात तसं काहीच नव्हतं. पण आई-वडिलांनीच त्याचं नाव ठेवलं होतं. हा मुलगा आई-वडिलांचं तिसरं अपत्य होतं. त्यामुळे त्याचं नाव ००३ असं ठेवण्यात आलं. आपली जडणघडण अमेरिकेत झाल्याचं त्याने सांगितलं. लहानपणी त्याला बँबिनो म्हणायचे. या नावामुळे मला सेलिब्रिटी झाल्यासारखं वाटतं. अनोख्या नावामुळे बरेच लोक मला भेटतात, हस्तांदोलन करतात. आपल्याकडेही वेगवेगळी नावं असतात. पण ००३ हे नाव भन्नाटच म्हटलं पाहिजे.

## अस्वलं झाली हिंस्त्र



हवामानबदल आणि माणसांच्या घुसखोरीमुळे ध्रुवीय अस्वलांच्या वर्तनात बदल झाल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. या कारणामुळे ध्रुवीय अस्वलं नरभक्षी होऊ लागली आहेत. ही अस्वलं अन्नाच्या शोधासाठी लांबवर भटकू लागली आहेत. मनुष्याच्या संपर्कात येणारी अस्वलं त्यांच्यावर हल्लाही करू लागली आहेत. इतकंच नाही, तर अन्नाच्या कमतरतेमुळे ती एकमेकांना मारू लागली आहेत. भूक भागवण्यासाठी अस्वलं कोणत्याही थराला जायला तयार आहेत. रशियन शास्त्रज्ञांनी याबाबत संशोधन केलं आहे. पिलांसोबत असणाऱ्या मादी अस्वलांवर नर अस्वलं हल्ला करत आहेत. जीवाश्म इंधनाच्या शोधासाठी बऱ्याच कंपन्यांनी आपला मोर्चा पृथ्वीच्या ध्रुवांकडे वळवला आहे. यामुळे ध्रुवीय अस्वलांच्या अधिवासावर परिणाम होऊ लागला आहे. तापमानवाढीमुळे उत्तर आणि दक्षिण ध्रुवांवरचा बर्फ वितळू लागल्यामुळे या अस्वलांपुढे बरीच आव्हानं उभी ठाकली आहेत. आपलं अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी अस्वलं प्रयत्नशील आहेत. मोठ्या आकाराची अस्वलं लहानग्या पिलांना खाऊ लागली आहेत. ध्रुवीय अस्वलं बर्फाच्या खाली पाण्यात असणाऱ्या सील माशांची शिकार करून पोट भरतात. पण इथला बर्फ वितळू लागल्यामुळे सील माशांची संख्या रोडावली आहे. याच कारणामुळे अस्वलं सैरभैर झाली आहेत. हवामानबदलाचे अत्यंत घातक असे परिणाम आपल्याला सोसावे लागत आहेत. हे बदल थांबवले नाहीत, तर या पृथ्वीवरचं मानवाचं अस्तित्व धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## इथे जायचंय... अॅपेंडिक्स काढून घ्या!

प्रत्येक देशात राहण्याचे काही नियम आणि अटी असतात. भारतीय नागरिकांकडे आधार क्रमांक असणं गरजेचं असतं. देशाचं नागरिकत्व बहाल करतानाही काही गोष्टींचा विचार केला जातो. एखाद्या देशात जाण्यासाठी आपल्याकडे व्हिसा असणं गरजेचं असतं. मात्र या परवानग्या, अटी हे सगळं कागदपत्रांपुरतं मर्यादित असतं. पण एखाद्या ठिकाणी राहण्यासाठी तुम्हाला अॅपेंडिक्सची शस्त्रक्रिया करायला सांगितली तर... आश्चर्य वाटलं ना! हे ठिकाण अंटार्क्टिकामध्ये आहे. या भागातल्या एका वस्तीत अधिक काळपर्यंत राहण्यासाठी अॅपेंडिक्स काढून टाकणं गरजेचं आहे. विलास लास अॅस्ट्रेलास असं या भागाचं नाव आहे. या भागात शास्त्रज्ञ आणि चिली देशाचं हवाई दल तसंच लष्कराचे अधिकारी राहतात. या भागात फक्त १०० लोक राहतात. काही लोक इथे आपल्या कुटुंब कबिल्यासह राहतात. इथे थोड्या-फार सोयी-सुविधा आहेत. अंटार्क्टिकामध्ये मोठं रुग्णालय असलं तरी ते विलास लासपासून एक हजार किलोमीटर अंतरावर आहे. इथे मोजके डॉक्टर्स आहेत. पण शल्यविशारद नाही. त्यामुळे कोणालाही अचानक अॅपेंडिक्सचा त्रास झाल्यास उपचार मिळू शकत नाहीत. याच कारणामुळे इथे अॅपेंडिक्स शस्त्रक्रिया करून घेणं गरजेचं ठरतं. या भागातलं सरासरी तापमान उणे २.३ अंश सेल्सियस आहे.



अंक्टार्क्टिकाच्या इतर भागाच्या तुलनेत हा भाग उष्ण मानला जातो. या भागात राहणं खूपच आव्हानात्मक आहे.

# महायुती सरकार शेतकरी विरोधी : आ. नाना पटोले

■ महासागर प्रतिनिधी
गोंदिया, दि. २६ :

राज्यातील महायुती सरकारने निवडणूक जाहीरनाम्यात शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र आता सरकार शेतकऱ्यांची चेष्टा करीत आहेत. परतीच्या पावसाने पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. त्याचबरोबर गोंदिया-भंडारा जिल्ह्यात शेतकऱ्यांना अडचणीत आणले आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना भरघोष मदत करण्याची गरज आहे. मात्र महायुतीची सरकार शेतकरी विरोधी आहे, असा आरोप काँग्रेसचे माजी प्रदेश अध्यक्ष आमदार नाना पटोले यांनी केला.



आ. नाना पटोले हे माजी आमदार गोपालदास अग्रवाल यांच्या द्वारे आयोजित दिवाळी मिलन सोहळ्याकरिता गोंदिया जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. दरम्यान त्यांनी प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधीशी संवाद साधला. याप्रसंगी त्यांनी भाजप नेते आ. परिणय फुके, मंत्री चंद्रशेखर बावणकुळे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह सरकारातील सर्व पक्षांच्या नेत्यांचा त्यांनी चांगलाच समाचार घेतला. ते पुढे म्हणाले, मंत्री बावणकुळे यांना शिंग फुटले असतील तर मला माहिती नाही. सरदार वल्लभभाई पटेल यांनी आरएसएसवर बंदी घालण्याचे विचार मांडले होते.

तेव्हा ते देशाचे गृह मंत्री होते. मग काय सरदार वल्लभभाई पटेल यांना देशद्रोही ठरविणार आहात काय? असा उलट सवाल केला. महायुतीचे नेते म्हणजे, उचलली जीभ लावली टाळ्या ला करणारे. मात्र हे आता चालणार नाही. कायदा सर्वांसाठी आहे, कायद्याप्रमाणे सर्व संघटनांनी वागावे.

ते म्हणाले, निवडणूका आल्या की, महायुतीचे नेते स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आल्याने आम्ही. त्यामुळे शेतकरी व सर्वसामान्यांच्या पाठिशी असल्याचे सांगत आहेत. निवडणूक जाहिरनाम्यात कर्जमाफी करू, असे आश्वासन दिले होते. मग कर्जमाफी का नाही? सरकार शेतकऱ्यांची चेष्टा करीत आहे. अदानीला जेव्हा पैसा दिला जातो, तो पैसा येतो कुठून? हे देखील या सरकारने सांगितले पाहिजे. शेतकऱ्यांची थट्टा करून कर्जमाफी द्यायची नसेल तर हे सुध्दा चालणार नाही. शेतकऱ्यांनी दिवाळी अंधारात साजरी केली. विदर्भासह राज्यातील शेतकरी अवकाळी व परतीच्या पावसाने अडचणीत आला आहे. ओल्या दुष्काळाची स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना भरीव मदत करण्याची गरज आहे.

# विद्यार्थिनीचे अपहरण करुन सामूहिक लैंगिक अत्याचार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

बाजारात फळे आणि भाजी विकत घ्यायला गेल्या एका सहावीच्या विद्यार्थिनीला दोन युवकांनी दुचाकीवर बसवून अपहरण केले. तिच्यावर दोघांनीही सामूहिक लैंगिक अत्याचार केला. लैंगिक अत्याचार करताना अश्लील फोटो आणि व्हिडिओ काढले. कशीतरी सुटका करुन ती मुलगी घरी पोहचली. आईला प्रकार सांगितल्यानंतर नंदनवन पोलिसांनी दोघांवर गुन्हा दाखल करीत अटक केली. करण रामटेके (वय २२, रा. नंदनवन झोपडपट्टी) आणि रोहित अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. करण हा कुख्यात गुंड आहे. त्याच्याविरुद्ध चोरीसह अनेक गुन्हे दाखल आहेत. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी सहाव्या वर्गात शिकत असून गेल्या अनेक दिवसांपासून करण व रोहित तिचा पाठलाग करायचे. २३ ऑक्टोबरला मुलगी फळ-भाजी खरेदीसाठी नंदनवन बाजारात गेली. करण व रोहितला ती एकटी जाताना दिसली. रोहित तिच्याजवळ गेला. काही वेळाने करणही तेथे आला. दोघांनी तिला धमकी देत बळजबरीने दुचाकीवर बसावले. दोघेही तिला बिडगाव परिसरातील लॉजवर घेऊन गेले. तेथे तिच्यावर दोघांनी लैंगिक अत्याचार केला. यादरम्यान त्यांनी मुलीचे अश्लील व्हिडिओ आणि फोटो काढले. याबाबत कोणाला सांगितल्यास व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी दिली.म ुलीने त्यांच्या तावडीतून सुटका केली आणि घर गाठले. तिने घडलेला प्रकार आईला सांगितला. आईने नंदनवन पोलिस ठाणे गाठून तक्रार दिली.

### ३० ऑक्टोबरपर्यंत कोठडी

मुलीने झालेल्या अत्याचाराबाबत आईवडिलांना सांगितले. ती अतिशय घाबरलेली होती. तक्रारीवरुन नंदनवन पोलिसांनी अपहरण, अत्याचारासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून करण रामटेकेला अटक केली. पोलिसांनी करण याला न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्याची ३० ऑक्टोबरपर्यंत पोलिस कोठडीत रवानगी केली. नंदनवन पोलिसांनी रोहितलाही अटक केली.

# कार्यकर्ता हाच भाजपचा कणा चंद्रशेखर बावनकुळे



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २६ :

दिनांक २५ ऑक्टोबर २०२५ ला शनिवारी रामटेक येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकातील गंगा भवन मंगल कार्यालय येथे भाजपा पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या संघटन मेळावा व कार्यकर्ता संवाद कार्यक्रमास जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी उपस्थित राहून सर्व कार्यकर्त्यांशी मनमोकळेपणाने संवाद साधला.

यावेळी बोलताना ना.चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले,"आजच्या कार्यकर्ता मेळाव्यातील उत्स्फूर्त उपस्थिती पाहून आनंद झाल्याचे सांगितले. सुरुवातीच्या काळात पक्षाची ताकद होती, पण सर्व कार्यकर्त्यांच्या एकजुटीने, निष्ठेने आणि मेहनतीने आज भाजपा रामटेक विधान सभेत न.१ चा पक्ष आहे.कार्यकर्ता हाच भाजपचा कणा आहे.दिवसेंदिवस पक्ष बळकट होत असल्याचा मनस्वी आनंद त्यांनी व्यक्त केला.

याप्रसंगी महाराष्ट्र राज्याचे महसूल व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे,माजी आमदार सुधाकर कोहळे, माजी जिल्हाध्यक्ष,डॉ. राजीव पोतदार, माजी जिल्हाध्यक्ष अरविंद गजभिये, माजी आमदार डी. मल्लिकार्जुन रेड्डी, माजी नगरपरीषद अध्यक्ष दिलीप देशमुख, माजी पं.स. सभापती नरेंद्र बंधाटे, माजी जि.प. सदस्य दुधराम सव्वालाखे, सतीश डोंगरे, जिल्हा महामंत्री उदयसिंह (गज्जु) यादव, संजय मुलमुले, ज्योती कोल्हेपारा, डॉ.राजेश ठाकरे, राहुल किरपान शहर अध्यक्ष रजत गजभिये,योगेश म्हात्रे, आलोक मानकर, वनमाला चौरागडे, विवेक तोतडे, जीवन मुंगले, राज हरणे, रविंद्र चव्हाण, उमेश पटले, ज्ञानेश्वर ढोक, कविता मुलमुले, चित्रा धुरई, सीमा पटले, संजय बिसमोगरे, मन्साराम अहिरकर ,उमेश रणदिवे, प्रभाकर खेडकर, प्रवीण मानापुरे, शिल्पा रणदिवे, लता कामडे, पदमा ढेंगरे, रत्नमाला अहिरकर, रामानंद अडामे,सौरभ दुबे,गोमेद आष्टनकर, राजेश जैस्वाल, उज्वला धमगाये सह सर्व पदाधिकारी व अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

## महिला व्यापारी आघाडीच्या अर्चना श्रीवास्तवांचा पक्षाला रामराम

■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. २६ :

आगामी नगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर भंडारा जिल्हा भाजपमध्ये मोठे अंतर्गत वादळ निर्माण झाले आहे. भाजप जिल्हा महिला व्यापार आघाडीच्या जिल्हाध्यक्ष अर्चना श्रीवास्तव यांनी थेट भाजपचे जिल्हाध्यक्ष आशु गोंडाने यांच्यावर गंभीर आरोप करत आपल्या पदाचा आणि प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. अर्चना श्रीवास्तव यांनी राजीनामा देताना जिल्हाध्यक्ष आशु गोंडाने यांच्यावर अपमान केल्याचा थेट आरोप केला आहे. "मी जेव्हा जिल्हा कार्यालयात गेले, तेव्हा जिल्हाध्यक्ष आशु गोंडाने यांनी मला अपमानित करणारे शब्द वापरले, माझा अपमान केला आणि पक्षातून बडतर्फ करण्याची धमकी दिली."









महासागर **Diwali special 2025** महासागर

















